म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २०५

१९०७

गद्यरत्नसमुच्चय.

REFBK-0000361

# मराठी गद्यरचनेसंबंधानें चार शब्द.

३६१ निबंध

REFBK-000361

प्रस्तुत ग्रंथ उत्तम गद्यात्मक वेच्यां
वावरूनच लक्षांत येण्यासारखें आहे.
ब्द लिहिणें प्रासंगिक वाटल्यावरून
रून वाचकांस आपल्या इकडील गद्य
जेल व तिचें महत्त्वही त्यांच्या ल...

गद्य हा शब्द गद् म्हणजे बोलणें या धातूपासून साधला आहे. य हें रूप भविष्य कृदन्ताचें असून त्याचा यौगिक अर्थ 'जें बोला-यें तें,' असा आहे; आणि यावरून, छन्द वगैरेंचा निर्बंध ज्यांत, म्हणजे अर्थात् साहजिक भाषणाप्रमाणेंच ज्यांत शब्दरचना , अशा वाक्यरचनेला गद्य ही संज्ञा रूढ झाली. शास्त्रीय, व्याव-रेक किंवा इतर मनन करण्यासारखे गंभीर विषय लिहावयाला द्यरचना अधिक सोयस्कर पडते. मनोरंजक विषयाला छन्दोबद्ध चना निसर्गतः अधिक अनुकूल असते. वरच्यासारखे विषय छन्दां-ध्यें रचणें अनवश्यक, किंबहुना अप्रयोजक आहे. तसले विषय व्यावहारिक भाषेंत लिहिले पाहिजेत. आणि ते तसे लिहिले तरच यांचा व्हावा तसा उपयोग होतो.

आपल्या इकडे गद्यरचनेचा प्रचार प्राचीनकालापासूनच विरळ आहे. आपले अतिप्राचीन ग्रंथ वेद होत. त्यांत व्यवहार, नीति, इतिहास, सृष्टिसौंदर्य, ललितकला, यज्ञादि क्रिया, धर्म, देवतावर्णनें, उपासना, ब्रह्मज्ञान असे विविध विषय आहेत. तरी त्या ग्रंथांची रचना छन्दोबद्ध आहे. पुढच्या बहुतेक संस्कृत ग्रंथकारांनीं आपल्या कृति प्रायः पद्यात्मकच करून ठेविल्या आहेत. वेदांविषयीं अत्यंत पूज्यबुद्धि असल्यामुळें त्या प्राचीन ग्रंथांच्या बाह्यांगाचें अनुकरण करण्याची इच्छा सदर ग्रंथकारांस झाली असावी असें वाटतें. धर्म-शास्त्र, व्याकरण, तर्क, इतिहास, गणित, कोश इत्यादि विषय-कीं, ज्यांचा छन्दोबद्ध रचनेशीं स्वभावतः विरोध-ते विषय देखील संस्कृ-तांत छंदांत रचिलेले आहेत! ही छन्दाविषयींची प्रीति आश्चर्य कर-

तिच्यांतील विषय ध्यानांतही धरण्यास सुलभ होतो ही गोष्ट नाकबूल करतां येणार नाहीं. तथापि एवढ्या एकाच कारणास्तव सगळे विषय सरसकट पद्यांत ग्रथित करण्याची अवश्यकता आहे असें नाहीं; असो. संस्कृतांत कित्येक निबंध, भाष्यें, काव्यनाटकादिकांवरील टीका, दशकुमार, कादंबरी इत्यादि ग्रंथ, गद्यात्मक आहेत. शिवाय चंपू, नाटकें, भाण इत्यादिकांमध्येंही गद्याचें मिश्रण बरेंच आढळतें. तरी पण एकंदरींत संस्कृत वाङ्मय छन्दोबद्ध आहे असें म्हणावयाला हरकत नाहीं.

मराठी भाषा परंपरेनें संस्कृतापासून निघाली आहे. हिच्या उत्पत्तिकालाविषयीं मतभेद आहे. तथापि ही इसवी सनाच्या सातव्या शतकापासूनच प्रचलित आहे याविषयीं आधुनिक विद्वान् शोधक गृहस्थांची एकवाक्यता आहे. सातव्या शतकापासून ज्ञानेश्वर महाराजांच्या कालापर्यंत जी ग्रंथरचना झाल्याचें प्रसिद्ध आहे, तीही बहुतेक पद्यात्मक आहे। ' बहुतेक ' असें म्हणण्याचें प्रयोजन असें कीं, ' लीलाचरित्र ' या नांवाचा जो महानुभावपंथी महंतांचा ग्रंथ आहे असें अलीकडे प्रसिद्ध झालें आहे, तो गद्यात्मक आहे. तो अकराव्या शतकाच्या आंत बाहेर झाला असें म्हणतात. शांकरमताची स्थापना आठव्या किंवा नवव्या शतकांत झाली असें अनुमान आहे. तिचा परिणाम अन्यत्र झाला तसा महाराष्ट्रांतही झाला; आणि त्यामुळें अद्वैतवेदान्ताची छाप मराठी आद्यग्रंथांवर बसली. ही गोष्ट ओघानेंच झाली. परंतु मराठी ग्रंथकारांनीं तरी आपले ग्रंथ पद्यात्मक रचण्याचें प्रयोजन काय? याचें कारण इतकेंच दिसतें कीं, ज्या संस्कृत वेदान्तादिग्रंथांशीं वरील मराठी ग्रंथकारांचा दृढ परिचय, ते बहुतेक पद्यात्मक असल्यामुळें, त्यांच्यासारखाच वेष आपल्या ग्रंथांस असावा असें त्यांस वाटलें असावें.

यापुढें नामदेवापासून तों अनंतफंदीपर्यंत म्हणजे अठराव्याशतकाच्या अखेरपर्यंत मराठी ग्रंथरचना बहुतेक पद्यात्मक आहे. आनंदतनय, रघुनाथपंडित इत्यादिकांच्या काव्यांत गद्यरचना क्वचित् चूर्णिकेच्या रूपानें दृष्टीस पडते. कटावाचा प्रकार कोणी गद्यांत गणतात. ही रचना अमृतराय वगैरे कवींनीं केली आहे.

वरील कालांतील मुख्य गद्यग्रंथ म्हटले म्हणजे जुन्या बखरी, पत्रव्यवहार वगैरे होत. यांपैकीं कांहीं मागें ' काव्येतिहाससंग्रह ' या

जाईपर्यंत गद्यरचनसंबंधानें इतकीच माहिती उपलब्ध आहे.

हल्लीं प्रचलित असलेल्या गद्यरचनेचें जनन गेल्या शतकाच्या द्वितीय चरणाच्या आरंभीं झालें. पहिला मराठी गद्य ग्रंथ इ० स० १८२६ त प्रसिद्ध झाला असें समजतें. ही गद्यरचना इंग्रजी अमलाबरोबर इकडे आली, आणि त्याच्याबरोबर तीही प्रसार पावली. इंग्रजी शिकलेल्या पहिल्या पिढींतील कित्येक गृहस्थांनीं कांहीं इंग्रजी गद्यग्रंथ प्रथम मराठी भाषेंत उतरले. हे गद्यग्रंथ त्या वेळच्या मराठी शाळांतून वाचनपुस्तकें म्हणून चालू झालें. येथूनच गद्यलेखन व गद्यवाचन यांचा प्रसार मराठींत सुरू झाला. बाळशास्त्री जांभेकर, सदाशिव काशिनाथ छत्रे, हरि केशवजी, दादोबा पांडुरंग, महादेव शास्त्री कोल्हटकर इत्यादि गृहस्थांची मराठी गद्यरचना सुप्रसिद्ध आहे. त्यांतूनही छत्रे यांचीं 'बाळमित्र' व 'इसापनिति' हीं पुस्तकें तर फारच सरस साधलीं असून त्यांची तारीफ अनेक मार्मिक विद्वानांनीं आजपर्यंत केली आहे. हीं पुस्तकें गद्यरचनेच्या दृष्टीनेंच केवळ उत्कृष्ट आहेत असें नाहीं, तर त्यांतील व्यवहार; नीति व बोध हीं केवळ अमोल आहेत. सदर ग्रंथांतील लेखनशैली अत्यंत मनोरम, सरळ व बालबोध आहे. हीं पुस्तकें आबालवृद्धांस अत्यंत प्रिय झालेलीं आहेत.

यानंतरच्या पिढींत परशुरामपंत गोडबोले, गोपाळराव हरि देशमुख, कृष्णशास्त्री चिपळूणकर इत्यादि बहुश्रुत व विद्वान् गृहस्थांनीं गद्यग्रंथ लिहिले. वर लिहिलेले तिन्ही गृहस्थ विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारखे आहेत. त्यांच्याविषयीं थोडेंसें लिहितों. परशुरामपंततात्यांस इंग्रजी येत नव्हतें असें म्हणतात. यांनीं संस्कृताच्या आधारें मराठींत रचना केली आहे. यांचा प्रसिद्ध गद्यग्रंथ 'कादंबरीसार' हा आहे. बाणाच्या कादंबरीचें हें मराठी सार आहे. हा ग्रंथ फार प्रौढ सरस व सरळ आहे. वरच्यापैकीं दुसरे गृहस्थ रा० ब० देशमुख होत. हे गृहस्थ मोठे शोधक व बहुश्रुत होते. लेखनाच्या व व्याख्यानांच्या द्वारें त्यांनीं आपल्या माहितीचा लाभ आपल्या देशबांधवांस करून दिला. त्यांची लिहिण्याची पद्धत जुनी गृहस्थी डौलाची आहे. तिच्यांत पांचपेंच नाहींत; साधेपणा आहे. पण माहितीनें तिला सौंदर्य आलें आहे. प्रस्तुत

वरील निबंधही प्रसिद्ध आहेत. त्यांवरून त्यांचीं भिन्न भिन्न विषयां-वरील मतें कळून येतात. देशमुखांनीं आपली माहिती इंग्रजी ग्रंथ, मराठी बखरी व जुने कागदपत्र यांच्या आधारानें लिहिली आहे. यानंतर कृष्णशास्त्री चिपळूणकर यांच्याविषयीं दोन शब्द अवश्य लिहिले पाहिजेत. शास्त्रीबोवा अत्यंत बुद्धिमान् असून त्यांचें शास्त्राध्ययन जुन्या पद्धतीप्रमाणें झालें होतें. न्याय व अलंकार या शास्त्रांत ते निपुण होते. प्रौढ वयांत त्यांनीं इंग्रजीचा अभ्यास केला मराठी संस्कृत व इंग्रजी या तिन्ही भाषांत त्यांनीं प्रवीणता संपादन केली. यांच्या बुद्धीमध्यें सूक्ष्मपणा, विशदपणा व व्यापकता हे धर्म विशेष होते. यांची कुशाग्र बुद्धि सर्व विषयांत सारखी चाले व त्यांतील मर्म त्यांस सहज समजे. त्यांचें वाचन फार विस्तृत असून त्यांचा विद्याव्यासंगही जबरदस्त होता. इंग्रजीमध्यें प्रवेश झाल्याबरोबर त्यांनीं आपल्या बुद्धिबलानें त्या प्रगल्भ भाषेंतील ज्ञानभांडार आपलेंसें करून घेतलें; त्यामुळें त्यास जो आनंद व लाभ झाला त्याचा अंश तरी मराठी वाचणारांस प्राप्त व्हावा अशा बुद्धीनें त्यांनीं मराठी ग्रंथरचना आरंभिली. यावरून त्याच्या ग्रंथरचनेचा हेतु किती उदात्त होता हें दिसून येतें. शास्त्रीबोवाचे ग्रंथ प्रायः भाषान्तररूप आहेत. परंतु ते विद्वान् व मार्मिक भाषाभिज्ञ होते यामुळें त्यांचीं भाषान्तरें मूळग्रंथासारखींच सरस उतरलीं आहेत. इंग्रजी व मराठी या भाषांमध्यें साद्दृश्य नाहींच असें म्हटलें तरी चालेल. यामुळें पहिलींतून दुसरींत बेमालूम तर्जुमा करणें किती अवघड आहे हें सहज लक्षांत येईल. तरी पण प्रस्तुतपंडितांचा या कामांत फारच मोठा लौकिक आहे. ‘ सॉक्रेतिसाचें चरित्र, ’ ‘ रासेलस, ’ ‘ अरेबियन् नाइट्स् , ’ ‘ अलेक्. विद्यामूलतत्त्वसंग्रह ’ या त्यांच्या भाषांतररूप कृति आहेत. पण या इतक्या सुंदर उतरल्या आहेत कीं, इंग्रजीचा गंधही ज्यास नाहीं त्याला देखील त्यांतील रसाचा अस्वाद सहज घेतां येतो. ‘ अर्थशास्त्रपरिभाषा, ’ ‘ व्याकरणावरील निबंध, ’ व इतर कांहीं शास्त्रीय विषयांवरील शालापत्रकांत प्रसिद्ध झालेले लेख, हे शास्त्रीबोवांच्या विद्वत्तेची, बुद्धिवैभवाची व विवेचकत्वाची साक्ष देतात. प्रस्तुत ग्रंथकारांत आणखीही एक गोष्ट विशेष होती. लक्ष्मी आणि सरस्वती यांचा एकत्र अधिवास जसा प्रायः अनुभवास येत नाहीं, त्याप्रमाणें

झाला होता. यामुळे त्यांची विवेचनपद्धति [illegible]
आहे. शास्त्रीबोवांची भाषा शुद्ध, प्रौढ, सरळ, सरस व मनोहर आहे. तिच्यांतील शब्दयोजना अत्यंत मार्मिक आहे. मोठालीं समासघटित पदें त्यांच्या लेखांत प्रायः आढळत नाहींत. यामुळें त्यांच्या लेखांत प्रसाद फार. त्यांची विवेचनपद्धति सुबोध, मुद्देसूद, व्यापक व मनोवेधक आहे. शास्त्रीबोवा शिक्षकही उत्तम होते. कठीण शास्त्रीय विषय देखील ते फार सोप्या व मनोरम भाषेंत समजावून देत असें त्यांचे विद्यार्थी सांगतात; आणि हा त्यांचा असाधारण गुण त्यांच्या निबंधांतूनही पूर्णपणें दिसून येतो. विद्वत्ता, विद्याव्यासंग, रसिकता, पांडित्य, लेखनचातुर्य इत्यादि लोकोत्तर गुणांमध्यें कृष्णशास्त्री हे प्रसिद्ध आंग्लपंडित डॉक्टर जॉन्सन् याच्या तोडीचे होते असें म्हटल्याशिवाय राहावत नाहीं.

इ० स० १८२५ पासून १८७५ सालापर्यंत जे गद्यग्रंथ झाले ते बहुतेक भाषान्तररूप आहेत. या कालांत कांहीं वर्तमानपत्रें व मासिकपुस्तकेंही उदयाला आलीं. 'शालापत्रक,' 'विविधज्ञानविस्तार,' व 'दंभहारक' हीं त्या वेळचीं गणनीय मासिकपुस्तकें होत.

यापुढचा म्हणजे १८७५ पासून आजमित्तीपर्यंतचा गद्यरचनेचा ओघ अंमळ वेगळ्या प्रकारचा आहे. नवीन नवीन विषय स्वतंत्ररीतीनें लिहिण्याची या कालांत सुरवात झाली. हिचे आद्यप्रवर्तक विष्णुशास्त्री चिपळूणकर हे होत. सहृदयता, लेखनचातुर्य व मार्मिकपणा हे वडिलांचे गुण विष्णुशास्त्री यांच्यामध्यें पूर्णपणें उतरले होते. यांना भाषाविषय व इतिहास यांची फार अभिरुचि होती. यांवरच यांनीं मोठा व्यासंग केला. तरी पण त्यांनीं इतर विषयांवरही थोडेंबहुत लिहिलें आहे. विष्णुशास्त्री यांचा मोठा ग्रंथ 'निबंधमाला' होय. प्रस्तुत ग्रंथांत त्यांच्या विचारांची स्वतंत्रता, रचनेची प्रौढी, सरसता, रमणीयता, इत्यादि अनेक गुण व्यक्त झाले आहेत. 'निबंधमाला' हा ग्रंथ विष्णुशास्त्री यांचें अक्षय्य स्मारक आहे. यांतील जॉन्सनाचें चरित्र, इतिहास, विद्वत्त्व आणि कवित्व, लोकभ्रम, इंग्रजीभाषा, विनोदमहदाख्यायिका, पुस्तकपरीक्षण इत्यादि विषय वाचून मनन करण्यासारखे आहेत. त्यांपासून माहिती,

[illegible] आढळतो. विष्णुशास्त्री गुणग्राही होते. विदेशीय लोकांच्या अनुकरणीय गुणांची जागोजाग त्यांनीं तारीफ केलेली आहे; व स्वकीयांच्या अंगीं खिळलेल्या दुर्गुणांचा त्यांनीं उपहास केला आहे. जेथें जेथें कांहीं चांगलें दिसेल तें घ्यावें व आपली उन्नति करून घ्यावी या मुद्यावर त्यांचा मोठा कटाक्ष आहे. त्यांचे ग्रंथ वाचतांना ही गोष्ट सहज लक्षांत येते.

विष्णुशास्त्री यांच्या पश्चात् आज पंचवीस वर्षांत निरनिराळ्या विषयांवर थोडेबहुत ग्रंथ झाले आहेत. मासिकपुस्तकें व विशेषतः वर्तमानपत्रें यांनीं बरीच मजल मारली आहे. यावरून या कालांत गद्यरचनेचा ओघ अधिक विस्तृत व विचित्र झाला आहे हें दिसून येतें. चिपळूणकरांच्या पाठीमागें गोपाळराव आगरकर, बाळ गंगाधर टिळक, महादेव शिवराम गोळे यांच्यासारखे कांहीं नामांकित विद्वान् लेखक झाले आहेत. तथापि ज्ञानाच्या प्रत्येक शाखेंत स्वतंत्र व मान्य ग्रंथ होऊन गद्यरचनेला परिणतावस्था प्राप्त होण्याचा काल अद्यापि बराच दूर आहे असें वाटतें.

आपण मनांत विचार करितों तो शब्दमय असतो. ते शब्द छन्दोबद्ध नसतात; आपण नेहमीं बोलतों तसे असतात. ते शब्द आपण मुखानें किंवा लिपीनें व्यक्त करितों. यावरून मनुष्याचा विचार साहजिकपणें गद्यांत होतो असें म्हणावयाला हरकत नाहीं; आणि अशा दृष्टीनें पाहिलें असतां गद्यरचनेचा प्रारंभ म्हणजे विचारकालाचा प्रारंभ होय. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं असेंच मत 'निबंधमालेंत'त एके प्रसंगीं व्यक्त केलें आहे. यांत पुष्कळ अर्थ आहे. पद्यरचनेचा (सामान्यपणें काव्याला पद्याचा वेष असतो म्हणून असें म्हटलें आहे.) प्रधान हेतु रंजन असतो; गद्यरचनेचा प्रधान हेतु ज्ञान असतो. पद्यांत थोडा तरी कृत्रिमपणा असणार; गद्यांत तो स्वाभाविकपणेंच नसणार. पद्यांत कल्पनांचें साम्राज्य तर गद्यांत विचारांचें प्राबल्य. या गद्यपद्यांतील भेदावरून गद्याचें खरें महत्त्व वाचकांच्या ध्यानांत येईल.

पुणें, मार्च, १९०७. } लक्ष्मण गणेशशास्त्री लेले.

# आवृत्ति दुसरी.

प्रस्तुत पुस्तकाचे दोन्ही भाग मुंबई इलाखा व मध्यप्रांत यांतील शाळाधिकाऱ्यांनीं, हायस्कुलांतील विद्यार्थ्यांकरितां, वाचनपुस्तकें म्हणून, मंजूर केले, याबद्दल सदर अधिकाऱ्यांचे आम्ही फार आभारी आहों.

या पुस्तकाची पहिली आवृत्ति दोन वर्षांपूर्वी छापिली, तेव्हां कोणता भाग कोणत्या इयत्तांकरितां तयार केला हें त्यांत स्पष्टपणें लिहिलें नव्हतें, त्यामुळें कित्येकांचा साहाजिकपणें थोडा गैरसमज झाला, शिवाय सहाव्या व सातव्या इयत्तांचा भाग प्रथम तयार केला म्हणून त्याला पहिला भाग असें म्हटलें होतें, व पुढील म्हणजे चौथ्या व पांचव्या इयत्तांचा भाग मागाहून निघाला म्हणून त्याला दुसरा भाग असें म्हणावें लागलें. हें थोडेसें नेहमींच्या वहिवाटीविरुद्ध झालें, या आवृत्तींत यासंबंधानें सुधारणा केली आहे, ती अशीः—

चौथी व पांचवी या इयत्तांकरितां जो पूर्वींचा दुसरा भाग होता त्याला आतां पहिला भाग असें म्हटलें आहे, व ग्राहकांचा गैरसमज होऊं नये म्हणून सदर पुस्तकाच्या मुखपृष्ठावर ' आंग्लो–मराठी चौथी व पांचवी या इयत्तांकरितां ' असें स्पष्ट लिहिलें आहे. तसेंच सहावी व सातवी या इयत्तांकरितां जो पूर्वींचा पहिला भाग होता त्याला आतां दुसरा भाग असें म्हटलें आहे; व ' आंग्लो–मराठी सहावी व सातवी या इयत्तांकरितां ' असे शब्द त्याच्याही मुखपृष्ठावर लिहिले आहेत. किंमती पूर्वीप्रमाणेंच ठेविल्या आहेत. ग्राहकांनीं पुस्तकें घेतांना किंवा मागवितांना या गोष्टीकडे लक्ष्य पुरवावें अशी त्यांस अगत्याची सूचना आहे.

प्रस्तुत पुस्तकांस पुणें येथील नूतन मराठी विद्यालयाच्या चालकांनीं पहिल्यापासून प्रोत्साहन दिलें आहे, याबद्दल त्यांचे आम्ही

या त्यांच्या उत्तेजनाबद्दल [illegible] आभार मानणें इष्ट आहे.

या आवृत्तींत धड्यांच्या आरंभीं आंतील मजकुरासंबंधानें जरूर येथें अधिक खुलासा केला आहे. बाकी म्हणण्यासारखा फेरफार कांहींएक केला नसून पूर्वी नजरचुकीनें राहिलेले दोष तेवढे काढून टाकले आहेत.

पुणें, जुलै, सन १९०९ इ. } लक्ष्मण गणेशशास्त्री लेले.

---

# आवृत्ति तिसरी.

दुसऱ्या आवृत्तीबरहुकूम ही आवृत्ति छापिली आहे. पुढील आवृत्तीचा योग आल्यास तिच्यामध्यें अधिक धडे घालण्याचा व दुसरेही कांहीं उपयुक्त फेरफार करण्याचा विचार आहे. शिक्षकांनीं न्यूनाधिक कळविल्यास त्याचा त्या वेळीं अवश्य विचार करूं.

पुणें, जून १९१३. } लक्ष्मण गणेशशास्त्री लेले.

# अनुक्रमणिका.


कृष्णाजी विनायक सोहनी. पृष्ठ.

१ वजीरातीच्या वस्त्रांचा समारंभ. ... ... २३

२ शिंद्यांची संपत्ति—त्यांच्या फौजेची कवाईत. ... १२१

सदाशिव काशिनाथ छत्रे.

१ जानोजीचें आपल्या बायकोस पत्र. ... ... १६०

परशुरामपंत तात्या गोडबोले.

दुर्योधनाचा मानी स्वभाव. ... ... १३

कृष्णशास्त्री चिपळूणकर.

१ विंध्याचल. ... ... ... ... ३

२ गतगोष्टींच्या ज्ञानाची आवश्यकता. ... ... ६२

३ खरा शाहाणा कोण ? ... ... ... ६५

४ नद्या. ... ... ... ... ८५

५ वाक्चातुर्य. ... ... ... ... १०४

६ नम्रपणा. ... ... ... ... ११८

७ योग्य अभिमान. ... ... ... ... १४१

विष्णुशास्त्री चिपळूणकर.

१ समुद्र. ... ... ... ... १

२ प्रवास. ... ... ... ... २०

३ मनुष्याचें अटोकाट ज्ञान. ... ... ... २५

४ महावीरचरित्राचें संविधानक. ... ... ५१

गोपाळ गणेश आगरकर.

१ झोंप. ... ... ... ... ६८

महादेव शिवराम गोळे.

१ सीमोल्लंघन. ... ... ... ... ९

२ तीन प्रकारचीं माणसें. ... ... ... ५३

गोविंदशास्त्री बापट.

१ दैव आणि उद्योग. ... ... ... ७९

२ प्राचीन इतिहास. ... ... ... १२६

३ सर विल्यम् जोन्स. ... ... ... १५१

**नागेश विनायक बापट.**

१ धावडशीकर स्वामिमहाराजांचा मठ. ... ... १३४

**विनायक कोंडदेव ओक.**

१ ब्रिटन देशांतील राज्यव्यवस्था. ( भाग पहिला. ) ४०
२ ,, ,, ,, ( भाग दुसरा. ) ४४
३ फ्रान्स देशाचा संक्षिप्त इतिहास. ... ... ७४
४ कुंभेरीचा वेढा. ... ... ... ९९
५ वीज. ... ... ... ... १४५

**रावजी भवानराव पावगी.**

१ पारिस शहर. ... ... ... ४६

**पंडिता रमाबाई.**

१ समुद्रावरील प्रवास. ... ... ... ३३
२ राष्ट्रीय न्यायसभा. ... ... ... ९३

**हरि कृष्ण दामले.**

१ 'गलिव्हर्स ट्राव्हल्स' या ग्रंथाची हकीकत. ... १३३

**हरि नारायण आपटे.**

१ खंडाळ्याच्या घाटांतील देखावा. ... ... १०९

**नरसिंह चिंतामण केळकर.**

१ एक उदात्त देखावा. ... ... ... ८२

**चिंतामण गंगाधर गोगटे.**

१ मयूरासन. ... ... ... १६

**मल्हार खंडेराव चिटणीस.**

१ आकाशगंगा. ... ... ... ३७

**वासुदेव गोविंद आपटे.**

१ अशोकाची योग्यता. ... ... ... ६०

**नारायण विठ्ठल आपटे.**

बालोद्यानपद्धतीचीं मूलतत्त्वें. ... ... ... १३६

**मुरलीधर मल्हार अत्रे.**

राक्षसभुवनची लढाई. ... ... ... ८८

**केसरींतील निवडक निबंध.** [ लेखकाचें नांव माहीत नाहीं. ].

१ पाऊस. ... ... ... ... १५९

# गद्यरत्नसमुच्चय.

## भाग पहिला.

### समुद्र.

हे सागरा ! तुझ्या अफाट विस्ताराकडे पाहून जों जों विचार करूं लागावें, तों तों नव्या नव्या कल्पना मनांत येऊं लागून बुद्धीस अधिकाधिक चमत्कार भासतात, आणि आश्चर्यभरांत चित्त अगदीं थक्क होऊन जातें ! ज्याप्रमाणें मनुष्यांच्या पिढ्यानपिढ्या एकामागून एक जन्मास येऊन कांहीं काळानें लागलीच विलयास जातात, त्याप्रमाणें तुजवर हजारों लाटा एकावर एक येऊन भराभर बुजून नाहींतशा होतात, आणि त्यांच्याप्रमाणेंच यांच्या वास्तव्याची मागें खूण देखील रहात नाहीं ! तुझ्या लाटा सर्व पृथ्वीच्या किनाऱ्यांवर आदळत आहेत, आणि ज्यांचें निकट सान्निध्य त्यांच्या अक्षय्य वैरास मात्र कारणभूत होतें, अशा देशांची तोडातोड करून तूं त्यांचें कलाकौशल्य व संपत्ति हीं परस्परांस देववितोस, व एणेंकरून सर्व जगास तुझ्यामुळें सुखाचा व समृद्धीचा लाभ होत आहे.

तुझे देखावे तरी निरनिराळ्या समयीं किती विचित्र असतात ! त्यांची शोभा व भव्यपणा हीं कोठवर वर्णावीं ! कधीं वाऱ्याची हालचाल अगदीं बंद होऊन तुझा सर्व

विस्तार अगदीं निश्चल दिसतो—कधीं नुकताच सूर्योदय झाला असल्यामुळें क्षितिजाची कड रुप्यानें जणूं काय मढविलीच आहे अशी भासते—कधीं तोच सूर्य अस्तास जाऊं लागून संध्याकाळचें आकाश त्याच्या सोनेरी किरणांनीं देदीप्यमान झालें असतें, व अशा वेळेस आरशाप्रमाणें स्थिर अशा तुझ्या पाण्यावर जेव्हां आकाशाची कमानची कमान शाबूत उठलेली असते, तेव्हां ती तर काय शोभा सांगावी! पण हीं सर्व सौम्य रूपें टाकून जेव्हां तूं आपलें उग्र स्वरूप धारण करतोस—जेव्हां काळ्या दाट ढगांनीं आकाशांत गाढ अंधार होऊन तुफानाच्या वाऱ्याच्या सोंसाट्यांनीं तूं अगदीं खवळून जातोस, व तुझ्या प्रचंड लाटा उसळून मेघमंडळाशीं एकवट होऊं पाहतात—जेव्हां मृत्यु आपलें भयंकर आधिपत्य तुजवर चोहोंकडे चालवीत असतो—जेव्हां अशा तडाक्यांस सांपडलेला बिचारा खलाशी भयानें गर्भगळीत होऊन त्याचे प्रयत्न निष्फळ होतात, व त्याचे इष्टमित्र त्याजकरितां जागच्या जागीं हळहळत असतात,—अशा भयंकर प्रसंगीं तुजकडे पाहण्याची कोणाची छाती आहे!

हे रत्नाकरा! इतकें झालें तरी हे सर्व खेळ केवळ तुझ्या पृष्ठभागावरचे! तुझें आंत जें विस्तीर्ण राज्य आहे त्यांत तर काय काय चमत्कार असतील याची कल्पना तरी कोणीं करावी! तेथें मोठमोठाले खडपे व विशाल दऱ्या असतील. त्यांत जे नानाप्रकारचे हजारों प्राणी व वनस्पति असतील, त्या पाहिलेला कोण मनुष्य आहे? व तसेंच रत्नें वगैरे ज्या कोट्यवधि सुंदर वस्तु तुझ्या तळीं लोळत असतील, त्यांचा तरी कोणास पत्ता लागेल काय?

यापमाणें विचार पुढें चालविले असतां बुद्धि अगदीं कुंठित होऊन जाते. पण जेव्हां तुझ्या भरती–ओहोटीविषयीं विचार करावा–कीं ज्या जगाच्या आरंभापासून आजपर्यंत कधींही टळल्या नाहींत–तेव्हां, ज्यानें आपल्या अपार सामर्थ्यानें तुला निर्माण केलें व तुझ्या मर्यादा अशा रेखून टाकिल्या कीं, तूं एवढा उच्छृंखळ खरा, परंतु त्यांचें उल्लंघन तुझ्यानें होऊंच नये, त्याच्या अगाध महिम्याकडे लक्ष लागून विचारशक्ति गुंग होऊन जाते व तिची गतीच पुढें होत नाहीं !

विष्णुशास्त्री चिपळूणकर.–किरकोळ लेख.

---

## विद्याचल.

मी एके दिवशीं रात्रीं विद्याप्राप्तीच्या उपायांविषयीं, ती प्राप्त झाल्यापासून होणाऱ्या सुखाविषयीं, व ती प्राप्त होण्यास जीं विघ्नें आहेत त्यांविषयीं एकाग्र चित्त करून पडलों असतां मला झोंप लागली, व पुढील चमत्कारिक स्वप्न मीं पाहिलें. तें असें:—

"मी एका अफाट मैदानांत उभा आहें व तेथून दूर अंतरावर उंच व रमणीय पर्वत दिसत आहे. त्यास विद्याचल म्हणत. त्या पर्वतावर जाण्याची उत्कंठा माझ्या मनांत उत्पन्न होऊन मी उभा होतों तेथून तिकडे जाण्यास जवळचा रस्ता कोणता असावा हें मी पाहूं लागलों असतां कांहीं अंतरावर एक सुंदर उपवन माझ्या दृष्टीस पडलें, व तिकडूनच त्या पर्वताकडे जाण्याची वाट असेल असें वाटून मी त्या उपवनाकडे चालता झालों.

"जवळ जाऊन पाहिलें तों तें उपवन फारच सुंदर होतें. तेथें जिकडे तिकडे झाडांच्या सुंदर व बेतानें लाविलेल्या रांगा असून सर्व झाडें हिरवीं टवटवीत होतीं, व कितीएक चित्रविचित्र रंगांच्या फुलांनीं व कितीएक उत्तम फलांनीं शोभायमान दिसत होतीं. त्या झाडांच्या मधून रमणीय वाटा होत्या व जागजागीं विश्रांति घेण्याकरितां सुंदर कुंज व गुंफा केल्या होत्या. हें अतिमनोहर उपवन पाहून मला पराकाष्ठेचें समाधान वाटलें व कांहीं वेळ स्वस्थपणें त्यांत विहार करावा असा विचार करून मी इकडे तिकडे त्या स्थलाची अपूर्व शोभा पहात फिरत होतों. फिरतां फिरतां एके ठिकाणीं झुळझुळ वाहणाऱ्या सुंदर ओढ्याच्या कांठीं हिरव्याचार व कोंवळ्या गवतार बसलेल्या तीन मूर्ति माझ्या दृष्टीस पडल्या. मग त्यांकडे वळलों व जवळ जाऊन पाहतों तों त्यांच्या भव्य व गंभीर मुद्रेवरून व अपूर्व तेजावरून त्या त्या ठिकाणच्या देवता असाव्या असें मला वाटलें. त्या तिघींपैकीं मध्यें जी देवता बसली होती, तिचें नांव एकांतवास. हिची मुद्रा विचारग्रस्त दिसत होती तरी तींत खेद किंवा दुःख यांचें चिन्ह अगदीं नव्हतें. तिच्या उजव्या बाजूस जी होती तिचें **नांव मौन**. ती तोंडावर तर्जनी ठेवून उगीच बसली होती. डाव्या बाजूस जी देवता होती तिचें नांव **मनन**. तिचे डोळे अर्धे उघडे व अर्धे मिटले असे असून तिनें वर दृष्टि लाविली होती. या देवतांच्या भव्य मुद्रा आणि अपूर्व व दिव्य तेज पाहून मी अगदीं दिपून गेलों, आणि मोठ्या विनयानें व लीनतेनें हात जोडून उभा राहिलों असतां मधली देवता कृपासूचक मु-

द्रेनें मजकडे अवलोकन करून अतिमधुर स्वरानें मला म्हणाली, ' अरे, तुझ्या मनांतील हेतु मला समजला. विद्याचलावर जाण्याचें तुझ्या मनांत आहे, नव्हे ? बरें, चल माझ्यामागून. पुष्कळ लोकांस मीं तिकडे पोहोंचविलें आहे व तें करणें माझें कामच आहे. त्या पर्वतावर जाण्यास या माझ्या वनांतूनच बहुतेक सर्वांस जावें लागतें. दुसरी चांगली व निश्चित वाट तिकडे जावयास नाहीं.' मग या अनुग्रहाबद्दल त्या उदार देवतेचा मोठा उपकार मानून मी मोठ्या आनंदानें तिच्या आज्ञेनें चालण्यास सिद्ध होतांच ती पुढें चालली, व तिच्या धोरणानें मी तिच्या मागें चालता झालों. थोड्याच वेळानें आम्ही विद्याचलाजवळ पोहोंचलों. त्या उपवनाचीं व त्या पर्वताची शांतता व शोभा पाहून मीं विचारिलें कीं, ' महाराज, या अनुपम व पवित्र स्थलीं कोण वास कारितात ? येथें केवळ सच्छील व सदाचरणी लोकांचा वास असावा, नाहीं बरें ?' मार्गदर्शक देवतेनें उत्तर केलें कीं, ' तूं ह्मणतोस तें एका प्रकारें खरें आहे. तूं ह्मणतोस असल्याच लोकांकरितां मुळीं हें स्थळ निर्माण केलें होतें व सत्ययुगांत तसल्याच लोकांचा येथें प्रवेश होत असे. त्या वेळेस मननशील व लोकहितपरायण असे महान् महान् मुनि या स्थळीं वास करीत. त्यांचा सर्व काळ तत्त्वविचारांत व जगास सुबोध करण्यांत व सन्मार्गीं लावण्यांत जात असे. त्यांच्याठायीं कवि आणि तत्त्वद्रष्टे या संज्ञा यथार्थ होत्या. याप्रमाणें पूर्वस्थिति होती. परंतु अलीकडे कांहीं काळापासून ही सर्व स्थिति बदलून गेली आहे. हल्लीं या स्थळीं दुर्गुणांनीं सद्गुणांचीं सोंगें घेऊन प्रवेश केला

आहे. याकरितां सज्जन मनुष्यांस या स्थळींही फार जपून वागावें लागतें. [ बोटानें दाखवून– ] तो पहा प्रतीकार ( सूड ) स्वाभिमान हें बनावट नांव धारण करून मोठ्या डौलानें कसा फिरत आहे ! तशी त्याच्याजवळ महत्त्वाकांक्षा कीर्तितृष्णा हें खोटें नांव धारण करून मोठ्या तोऱ्यानें मिरवत आहे ! याप्रमाणें कितीएक दुर्गुणांनीं नानाप्रकारचीं रूपें घेऊन येथें आपला फैलाव मांडला आहे.'

"आम्ही इतक्यांत विद्याचलाचे अगदीं पायथ्याशीं येऊन पोहोंचलों. या ठिकाणीं कितीएक लबाड वाटाडे होते. ते 'या इकडे या. आम्ही तुम्हांस चांगली वाट दाखवितों.' असें म्हणून तो पर्वत पहावयास जाणारांच्या पाठीस लागत. त्या सर्वांत पोकळ गर्व या नांवाचा जो वाटाड्या होता, तो तर पराकाष्ठेचा आग्रह करी व मी तुम्हांस अतित्वरेनें व श्रमावांचून वर घेऊन जातों असें सांगे; व पुष्कळ वाटसरू लोक त्याच्या गप्पा खऱ्या मानून त्याच्या अनुरोधानें जात व ते बापडे त्या पर्वताच्या पायथ्याच्या निबिड झाडींतच नेहमीं गोंधळत असत. असो; मी त्या वाटाड्याच्या मोहक भाषणाकडे लक्ष न देतां पूर्वींच्या देवतेच्या मागोमाग चाललों. पुढें पाहतों तों पर्वताच्या माथ्यावर जावयास दोन रस्ते होते व प्रत्येक मार्गाच्या तोंडाशीं एकेक रखवालदार होता. एका रस्त्याच्या नाक्यावर जो रक्षक होता तो त्या रस्त्यानें जाऊं इच्छिणाराची चौकशी करी व ज्यास सरस्वती जन्मतः प्रसन्न आहे असें त्यास आढळे त्यास मात्र तो जाऊं देई. दुसऱ्या रस्त्याच्या नाक्यावर जो रखवालदार होता त्याचें नांव व्यासंग. पहिल्या रस्त्याच्या

नाक्यावर नाकारलेले सर्व व इतर पुष्कळ दुसऱ्या नाकेवाल्याजवळ परवानगी मागण्यास येत व तो प्रायः कोणालाही ना म्हणत नसे. परंतु तो परवानगी देण्याविषयीं फारच चेंगटपणा करी; व त्यानें खुला केलेला रस्ता इतका बिकट व भ्रामक असे कीं, जे तो पतकरीत त्यांपैकीं पुष्कळ लौकर किंवा उशीरां कंटाळून परिणामीं पुढें जाण्याविषयीं नाउमेद होऊन मागें फिरत. या रस्त्यानें जाणाऱ्यांपैकीं फारच थोडे पर्वताच्या शिखरास जाऊन पोहोंचत. या दोन रस्त्यांहून निराळा एक तिसरा रस्ता होता. तो वरील दोन्ही रस्ते अंशतः एकत्र होऊन झाला होता. परंतु हा मार्ग गुप्त असे व ज्या दैववान् मनुष्यांस तो सांपडे ते लौकर इष्ट ठिकाणीं जात. असो; मी आपल्या मार्गदर्शक देवतेस म्हणालों कीं, ‘ हे देवि ! मला विंध्याचलाच्या शिखरापर्यंत चढण्याची उमेद वाटत नाहीं. कांहीं उंच चढून तेथून दिसेल तितकाच चमत्कार पाहून आपलें समाधान करून घ्यावें अशी माझी इच्छा आहे.’ तिनें उत्तर केलें कीं, ‘ बाबा तसें होण्याचा संभव नाहीं. अर्ध्या वाटेवर जाऊन मध्यें थांबलें असतां थांबणारा वरून खालीं एकदम तळाशीं पडतो. तर तुला धैर्य खचूं न देतां शेवटपर्यंत वर चढलें पाहिजे.’ मग तिच्या उत्तेजनानें मीं शिखरापर्यंत तिच्या मागून जाण्याचा दृढ निश्चय केला.

“ आम्ही मध्यभागापेक्षां कांहीं वर गेल्यावर आम्हांस शिखर दिसूं लागलें. तेथें दोन मूर्ति प्रथम माझ्या दृष्टीस पडल्या. त्यांत एक तरुण व अत्यंत सुंदर स्त्री होती. ती अत्यंत चपळ होती. तिच्या अंगीं असा कांहीं विलक्षण

प्रभाव होता कीं, ती एका निमिषांत अत्यंत दूरच्या प्रदेशांत जाऊन परत येई. ती आपले पोषाख क्षणोक्षणीं बदली. कधीं कधीं ते अत्यंत सुबक, स्वाभाविक व फारच शोभणारे असत व कधीं कधीं ते फारच वेडेविद्रे व उपहासास्पद असत. तिच्या शेजारीं एक पुरुष असे. त्याचें वय प्रौढ असून मुद्रा फार गंभीर असे. तिनें वेडेविद्रे पोषाख व दागिने घातले असतां, आपल्या हातीं एक आरसा असे तो तिजपुढें करून तो तिची चूक तिला दाखवी; व तो उपहासास्पद पोषाख व भूषणें तिच्या अंगावरून हिसकून घेऊन पर्वताखालीं झुगारून देई व तीं खालीं पडल्याबरोबर तेथें फिरणारे खरोखरी अज्ञान परंतु सज्ञानांचा अभिमान बाळगणारे तीं खराब भूषणें व वस्त्रें लेऊन मोठ्या दिमाखानें मिरवूं लागत! या तरुण स्त्रीचें नांव कल्पना व पुरुषाचें नांव पक्वविचार. यांची एक मुलगी होती. तिच्यासारखी मोहक स्वरूपाची स्त्री त्या पर्वतावर दुसरी नजरेस पडली नाहीं. तिचें नांव कविता. ही मुलगी एका उंच आसनावर बसली होती व तें आसन अनेक उत्तम कवींचीं काव्यें एकत्र करून बनविलें होतें. मग कांहीं वर गेल्यावर पर्वताचा वरील प्रदेश लागला. तेथील शोभा काय वर्णावी! तेथील हवा शांत व स्वच्छ होती. तेथें सर्वकाळ वसंत वास करितो. आसमंतात् कल्पवृक्षांची बाग लागून गेली होती व जिकडे तिकडे दिव्य परिमल सुटला होता. तेथें दोन टेंकड्यांच्या मध्यें एक सुवर्णाचा विस्तीर्ण व शोभायमान मंडप होता. त्याच्या मध्यभागीं रत्नजडीत सिंहासनावर विद्यानाथ जो गणपति तो विराजित

होता व त्याच्या शेजारीं वीणापुस्तकधारिणी शारदा बसली होती. पुढें गंधर्वांचें मधुर गायन व अप्सरांचें सुंदर नृत्य चाललें होतें. त्या दिव्य सभेंत विश्वामित्र, उशना, वाल्मीकि, कृष्णद्वैपायन, गुणाढ्य, कालिदास, भवभूति, बाण, गोवर्धन आदिकरून कवि आणि जैमिनी, यास्क, कपिल, पतंजलि, गौतम आदिकरून शास्त्रप्रवर्तक बसले होते. पृथ्वीवरील दुसऱ्या देशांतील प्राचीन महाकवि व शास्त्रकर्तेही तेथें दिसत होते. ही अपूर्व सभा पाहून मी अगदीं चकित झालों, व मला अवर्णनीय आनंद झाला. त्या पर्वतावरून खालच्या लोकांचे व्यापार स्पष्ट नजरेस पडत होते. सदाचरणाचा मार्ग सर्वांच्या जवळ असतां लोभ, मत्सर इत्यादि ठकांच्या मोहजालांत गुंतल्या-मुळें बहुतेकांस तो जवळ असून दिसत नसे, व ते बापडे उगीच संकटांत व दुःखांत पडत. हें सर्व त्या पर्वतावरून अम्हांस स्पष्ट दिसत असे. त्यांची ती दुःखावस्था पाहून माझ्या मनास मोठा धक्का बसला व त्या धक्याबरोबर मी जागा झालों."

शालापत्रक, पु० ८ अंक ६.

---

## सीमोल्लंघन.

[ कै. माहादेव शिवराम गोळे यांनीं दसऱ्याच्या मुहूर्तावर एकदा विद्यार्थ्यांस उपदेश केला, तो खालीं दिला आहे. ]

आज दसऱ्याचा सण आहे. या दिवसाचें मुख्य कर्तव्य सीमोल्लंघन हें आहे. पूर्वीं ज्या वेळीं मराठे लोकांत वीर-श्रीचा केवळ अवतार झाला होता व स्वपराक्रमानें दिग्वि-

जय संपादण्याची उत्कट आशा त्यांच्या हृदयांत वागत होती, त्या वेळीं नवे नवे मुलूख काबीज करण्याकरितां ते जेव्हां बाहेर पडत, तेव्हां वर्षाकालाच्या अखेरीस येणारा हा सण स्वराज्याची सीमा ओलांडून पलीकडे जाण्यास सुमुहूर्त गणिला जात असे. केवळ बाहुबलाच्या उत्कर्षाचे ते दिवस आतां गेले, परंतु त्यांबरोबर वीरश्रीचा किंवा पराक्रमाचा काळ गेला असें नाहीं. ती वीरश्री व तो पराक्रम मानसिक विजयाच्या श्रेष्ठतर कर्तव्याकडे आतां योजला पाहिजे. आपल्या अंगीं असणाऱ्या अनेक दोषां-मुळें आपल्या उद्योगास, आपल्या संपत्तीस, आपल्या सर्व प्रकारच्या उन्नतीस, किंबहुना आपल्या मनोराज्यास देखील अतिदुस्तर सीमांचें सर्व दिशांनीं आवरण पडलें आहे. या आवरणामुळें, आपणांस आपली बुद्धि, सुविचार व कर्त-बगारी प्रकट करून दाखविण्यास इतका आकुंचित प्रदेश उरला आहे कीं, त्यांची पूर्ण वाढ होऊं शकत नाहीं व त्यांच्या ऱ्हासास अकालींच आरंभ होतो. तेव्हां या तारु-ण्याच्या भरतीच्या काळांत तुह्मांमध्यें जी वीरश्री व जी महत्त्वाकांक्षा वागत असेल तिचा खरा सदुपयोग म्हटला म्हणजे स्वतःचे व कुटुंबस्थितीचे सर्व दोष व न्यूनता दूर करणें, व तेणेंकरून उद्योगादि इष्ट हेतूंस आकुंचित कर-णाऱ्या दुसऱ्या सीमांचें उल्लंघन करणें हा होय. या प्रका-रच्या सीमोल्लंघनास तुम्हीं प्रवृत्त व्हावें व आजच्या या सुमुहूर्तानें आपला निश्चय तडीस नेण्याच्या उपाय-चिंतनास लागावें.

या प्रकारच्या सीमोल्लंघनापासून जो एक अत्यंत इष्ट परिणाम घडून येईल तो हा कीं, या राष्ट्रांतील लोकांविषयीं जगांत बहुमान उत्पन्न होईल, व आमच्या राज्यकर्त्यांपैकीं अनेक उदार पुरुष व स्त्रिया आपणांस राष्ट्रोन्नतीच्या कामीं मदत करण्यास तयार होतील. पूर्वी एका काळीं हा हिंदुस्तान देश कोठें आहे, कसा आहे, इत्यादि गोष्टींविषयीं युरोपांत कोणासही चांगली माहिती नव्हती. त्या वेळीं या देशास सुवर्णभूमि हें नांव प्राप्त झालें होतें, व या देशाच्या अपार संपत्तीविषयीं व विलक्षण रीतीभातींविषयीं युरोपांतील लोक हव्या त्या असंभाव्य कल्पना करीत असत. त्या पूर्वीच्या काळीं परद्वीपस्थ लोक आपणांविषयीं कोणते कुतर्क करितात, याविषयीं आपण बेफिकीर राहिलों असतों, तर त्यामुळें आपलें मुळींच नुकसान होण्याचा संभव नव्हता. परंतु हल्लीं तशी स्थिति नाहीं. या देशाविषयीं व येथील राहणारांविषयीं सर्व सुधारलेल्या राष्ट्रांस चांगली माहिती झाली आहे, व त्यांतील एका अतिबलाढ्य राष्ट्राचा या देशावर अम्मल सुरू झाला आहे. ज्यांस आपणांविषयीं माहिती आहे व ज्यांशीं आपला नित्य संबंध येतो, त्यांचें आपणांविषयीं चांगलें मत असावें याबद्दल आपणांस काळजी घेतली पाहिजे. तसेंच, ज्यांच्या हातीं आपलें हित किंवा अहित करण्याचें आहे, त्यांस आपली योग्यता व आपले गुण कळावे, त्यांमध्यें कोणत्याही आत्मदोषानें आपणांविषयींचा गैरसमज किंवा तिरस्कार उत्पन्न होऊं नये, अशाविषयीं आपला नित्य प्रयत्न असला पाहिजे. आपण अशक्त,

आळशी, निरुद्योगी, अपराक्रमी व केवळ गतानुगतिक आहों, असा आपला दुर्लौकिक सर्व सुधारलेल्या राष्ट्रांमध्यें होत आहे, व जर आपण या दुर्गुणांपासून मुक्त होण्याचा मनापासून प्रयत्न केला नाहीं, तर आपणांस कोण मान देईल ? कोण आपल्या उपयोगीं पडेल ?

आपल्या पूर्वजांच्या संबंधानें युरोपियन लोक जेव्हां स्तुतीचे उद्गार काढितात, तेव्हां ते स्वतःच्या प्राचीन पूर्वजांशीं त्यांची तुलना कारितात. परंतु जेव्हां हल्लींच्या एतद्देशीयांविषयीं ते कांहीं उद्गार काढितात, तेव्हां ते स्वतःशीं त्यांची तुलना कारितात. या तुलनेंत आपण कमी पडलों, तर तो दोष कोणाचा ? पूर्वजांच्या स्तुतीबद्दल जसें आपणांस समाधान वाटतें, तसें स्वतःच्या न्यूनतांबद्दल आपणांस अत्यंत दुःख वाटलें पाहिजे.

आपल्या न्यूनता दूर करण्याकरितां आपण मनापासून झटत आहों; नवीन विद्या, नवीन कौशल्य, नवीन उद्योग व नवीन विचारसरणी ग्रहण करण्यास आपण तयार आहों; व त्यामुळें आपणांस पुनः ऊर्जित काळ येण्याची शक्यता आहे, असें आपल्या राज्यकर्त्यांपैकीं जे विचारी व थोर मनाचे पुरुष आहेत त्यांस दिसून आल्यास, ते आपले साहाय्यकर्ते होतील व त्यांच्या साहाय्यानें कित्येक दुःसाध्य गोष्टीही सुसाध्य होतील, यांत शंका नाहीं.

शाळेचा अभिमान आणि कुटुंबाचा अभिमान.

---

# दुर्योधनाचा मानी स्वभाव.

[ भारतीय युद्धामध्यें दुर्योधनाचे सगळे बंधु मरण पावले. भीष्म, द्रोण, कृप, कर्ण इत्यादि कौरवपक्षपाती महावीर नष्ट झाले. तेव्हां धृतराष्ट्र, गांधारी आणि संजय यांनीं दुर्योधनाला युद्ध सोडून देऊन पांडवांशीं साम करण्याविषयीं उपदेश केला. परंतु मानी दुर्योधनाला तो उपदेश मान्य झाला नाहीं. त्यानें वीराला उचित असें समर करण्याचा निश्चय केला. ही हकीकत खालीं संभाषणारूपानें दिली आहे. ]

दुर्यो०—अगे आई, समरापासून निवृत्त होऊन म्यां काय करावें ?

गांधारी—तुझा पिता किंवा विदुरभवोजी सांगतील तें करावें.

संजय—राजा, गांधारीआई ठीक बोलते. असेंच करावें.

दुर्यो०—संजया, अद्यापि मला उपदेश करावयाचा राहिला आहे काय ?

संजय—राजा, जोंवर देहांत प्राण आहे, तोंवर जय मिळविणाऱ्यांस बुद्धिमंतांनीं उपदेश करावा, आणि त्यांनींही तो ऐकावा, हें योग्य आहे.

दुर्यो०—( रागानें ) बरें तर, आपण बुद्धिमंत आहांच, आणि मीही जयेच्छु आहें; तर या समयास योग्य असा कोणता आपला उपदेश आहे तो सांगा. मी ऐकायास सिद्ध आहें.

धृत०—वत्सा, हा संजय चांगली सोईची गोष्ट सांगत असतां त्याजवर उगाच कां बरें रागें भरतोस ? तूं

जर स्वस्थचित्त होऊन ऐकशील तर, तो कशाला, मीच सांगतों ऐक.

दुर्यो०—तुला फार कांहीं सांगावयाचें नाहीं. त्या युधिष्ठिराचें जें काय मागणें असेल तें त्याला देऊन त्याच्याशीं संधि करावा, इतकेंच आमचें तुला सांगणें आहे.

दुर्यो०—हे ताता, पुत्रमोहामुळें अंबा आणि असमंजसपणामुळें संजय असें बोलतात. पण तुम्हांलाही हा व्यामोह असावा काय ? अथवा पुत्रशोकानें जो हृदयास संताप झाला तो असें वदवील. परंतु, हे ताता, पहा बरें, ज्या वेळेस शंभर बंधु कायम होते त्या वेळेस देखील साम करण्याविषयीं वासुदेव आर्जव करीत असतां मीं त्याचा अव्हेर केला. आतां तर दुःशासनादि सर्व भ्राते भीष्म, द्रोण व इतर मोठेमोठे साह्यकर्ते राजे, हे सर्व मरण पावले! या समयीं ह्या तुच्छ शरीराच्या मात्र लोभाकरितां, थोरांच्या मंडळींत लाज अणणारा आणि परिणामीं दुःख देणारा असा संधि पांडवांशीं मीं कसा करावा बरें? कां, नीतिनिपुणा संजया, मी ह्मणतों हें खरें? आणखी सांगतों, जरी आम्हीं संधि करूं म्हटलें तरी घडणार नाहीं. कारण,

आर्या.

जे हीनशक्ति झाले रिपु त्यांशीं नृप न संधि करितील;
संप्रति सानुज पांडव, हीनानुज मी, मला न वरितील.

धृत०—वत्सा, असें जरी झालें तरी म्यां सांगितलें असतां आणि मागून घेतलें असतां युधिष्ठिर कोणतीही

गोष्ट न ऐकेल असें होणार नाहीं. तुला आणखी एक सांगतों, युधिष्ठिर सर्वदा आपणास अपकृष्ट असें मानतो.

दुर्यो०—असें कां बरें ?

धृत०—ऐक सांगतों. युधिष्ठिराची अशी प्रतिज्ञा आहे कीं, चौघांतून एक जरी भ्राता नष्ट झाला तरी मी प्राण धारण करणार नाहीं. यास्तव संग्रामांत मरणाची पाळी कोणावर येईल आणि कोणावर न येईल याचा नियम नाहीं. म्हणून अनुजांच्या नाशाची शंका त्याच्या मनांत नेहमीं वागत आहे. ह्या कारणामुळें, तुला आवडेल तसा संधि करावयास देखील तो आज सिद्ध होईल, असें मला वाटतें.

संजय—खरी गोष्ट. असेंच आहे.

गांधारी—मुला, हें तुझ्या पित्याचें भाषण सयुक्तिक दिसतें. हें खरें मान.

दुर्यो०—अहो तात, अंब, अरे संजया, ऐका; तुमच्याच बोलण्यावरून न्याय झाला. पहा,—

## श्लोक.

एका बंधुविनाहि जीवित नसो पार्थ प्रतिज्ञा अशी,
मेले शंभर, म्यां स्वजीवितधनीं आशा धरावी कशी !
मी दुःशासनशोणिताशनरिपुप्राणा नको संहरूं ?
लज्जा मानहि सोडुनी कृपणसा संधीच यांशीं करूं ?

गांधारी–( हें ऐकून शोक करिते. ) हा बाळा दुः–शासना, हा दुर्मर्षणा, हा विकर्णा, अरे मला टाकून तुम्ही कोठें गेलां ? ( आपणास म्हणते ) अगे वीरशतप्रसविनि गांधारि, तूं दुःखशताला प्रसवलीस, सुतशताला नाहीं !

( सर्व ढळढळां रडतात. )

**संजय**— ( डोळ्यांत अश्रु आणून ) अहो तात, अहो अंब, तुम्ही राजा **दुर्योधनाचें** सांत्वन करून त्यास बोध करावा म्हणून ह्या समरभूमीस आलां, आणि तुम्हीच असें करितां हें काय? कांहीं विवेक करा.

**धृत०**—वत्सा, आमचीं दैवें तर अत्यंत प्रतिकूल झालीं आहेत, आणि तूंही शत्रूंविषयीं आपला मानबंध सोडीत नाहींस, तर अशा समयीं एकट्या तुजवर जीव धरणारी आणि निरंतर दुःख भोगणारी ही तुझी आई **गांधारी** हिनें कोणाचा आश्रय करावा! आणि म्यां तरी कोणाला शरण जावें? सांग बरें?

**दुर्यो०**—ऐकावें तात, सांगतों काय करावें तें.

**श्लोक.**

पृथ्वी आकाळिली जिहीं सकळ तें ऐश्वर्यही भोगिलें,
राजांनीं स्वशिरःस्थरत्ननिचयें ज्यांच्या पदां पूजिलें,
गेले ते शतपुत्र शत्रुंसि रणीं मारोनियां स्वःपुरा!
पूर्वीं ज्या धरिलें धुरेस **सगरें** ती सात वाहो धुरा!

याहून विपरीत केलें असतां क्षात्रधर्माचें उल्लंघन केलें असें होईल!

वेणीसंहारनाटक.

---

# मयूरासन.

औरंगजेब बादशाहाजवळ एकंदर सात सिंहासनें होतीं. त्यांपैकीं एकावर फक्त हिऱ्यांचेंच काम केलेलें असून,

बाकीच्या सहांवर हिरे, पाच, माणीक, मोतीं यांचीं कामें केलेलीं होतीं.

वरील सिंहासनांपैकीं मुख्य सिंहासनास मयूरासन असें म्हणत असत. तें मुख्य दरबारच्या ठिकाणीं ठेविलेलें असे. त्याची लांबी सुमारें ६ फूट व रुंदी सुमारें चार फूट होती. या सिंहासनास वीसपासून पंचवीस इंच उंचीचे भक्कम चार पाय असून त्यांत चार गातें बसविलेलीं होतीं, व यांच्या आधारानें गादीची जागा तयार केलेली होती. वर सांगितलेल्या गातांपैकीं तीन बाजूंच्या म्हणजे उजव्या, डाव्या व मागच्या बाजूंच्या अशा तीन गातांवर वरील मेघडंबरीस आधारभूत असे बारा खांब उभे केलेले होते. पुढची किंवा दरबारच्या समोरची बाजू अगदीं खुली होती. पाय व गातें सोन्यानें मढविलेलीं असून त्यांवर उत्कृष्ट नक्षीचें काम केलेलें होतें. त्यांच्यांत जागजागीं हिरे, माणकें, व पाच यांचे हजारों खडे बसविलेले होते. प्रत्येक गाताच्या मध्यभागीं एक मोठें बदकशाही माणीक बसविलेलें होतें, व त्याच्या चार बाजूंस चार पाच बसविलेले होते; व अशा रीतीनें गाताच्या दोन्ही टोंकांपर्यंत माणकांच्या चौकड्यामध्यें एक मोठा पाच, व पाचेच्या चौकड्यामध्यें एक मोठें माणीक असें उत्तम जडावाचें काम केलेलें होतें. तसेंच या चौकड्यामध्यें मध्यंतरीं जी जागा खुली होती तिच्यांतून हिरे बसविलेले होते. या प्रत्येक हिऱ्याचें वजन दहापासून बारा कारातांपर्यंत होतें. हे हिरे कांहींसे चापट परंतु तेजः-पुंज होते. सिंहासनाचे कांहीं भागावर सोन्याचे कोंदणांत पाणीदार मोत्यें बसविलेलीं होतीं. ह्या सिंहासनास चार

पायऱ्या होत्या. सिंहासनावर भरजरी गाशा व त्यावर लोड व तिवाशा होत्या. तसेंच त्याच्या एका बाजूस ढाल, तरवार, धनुष्य, बाणांचे भाते वगैरे आयुधें लटकलेलीं होतीं. हीं सर्व हत्यारें, गाशे, लोड, तिवाशा व सिंहासनाच्या पायऱ्या हीं वर सांगितलेल्या सर्व प्रकारच्या रत्नांनीं विभूषित केलेलीं होतीं.

या सिंहासनास जडलेल्या माणकांमध्यें १०८ माणकें फारच मूल्यवान् होतीं. त्यांपैकीं अगदीं हलक्या माणकाचें वजन १०० कारात असून कांहीं कांहीं २०० कारातांहून जास्त वजनाचीं होतीं. उत्कृष्ट पाणीदार पाचही पुष्कळ जडलेले होते, परंतु ते फुटलेले होते व त्यांचें वजन ३० पासून ६० कारातांपर्यंत होतें. सिंहासनास माणकांपेक्षां पाच जास्त बसविलेले होते. मेघडंबरीच्या आंतल्या बाजूस हिरे, मोत्यें वगैरे बसविलेलीं असून सभोंवार मोत्यांची झालर लाविलेली होती. मेघडंबरीचा घुमट चतुष्कोण असून त्यावर एक मयूराचें चित्र बसाविलेलें होतें. त्याचें शेंपूट उभारलेलें असून त्याच्यावर नीळ व दुसरे निरनिराळ्या रंगांचे उत्कृष्ट खडे बसविलेले होते. त्या मयूराचें सर्वांग सोन्यानें मढविलेलें होतें, व त्यांत उत्कृष्ट रत्नें बसविलेलीं होतीं. त्याच्या छातींत एक मोठें माणीक बसविलेलें होतें, व तेथून एक पिवळट रंगाचें ५० कारात वजनाचें मोतीं खालीं लटकत ठेविलेलें होतें. मयूराच्या दोन्ही बाजूंस त्याच्या उंचीइतकेच दोन गुच्छ बसविलेले होते, व त्यांत सोन्याचीं फुलें बसविलीं असून त्या फुलांत निरनिराळीं रत्नें बसविलेलीं होतीं. सिंहासनाची जी बाजू दरबाराच्या समोर होती,

तिच्यांत एक ८०।९० कारात वजनाचा तेजःपुज हिरा अशा रीतीनें बसविलेला होता कीं, बादशाहा सिंहासनावर बसला म्हणजे त्या हिऱ्याचें तेज त्याजवर पडत असे. या हिऱ्याच्या सभोंवार माणकें व पाच बसविले होते. तथापि या सिंहासनाचा अतिशय मूल्यवान् भाग म्हटला म्हणजे मेघडंबरीच्या खालीं जे खांब होते तो होय. या खांबांसभोंवार उत्कृष्ट पाणीदार मोत्यांचे सर सोडलेले होते, व या प्रत्येक मोत्याचें वजन ६।१० कारातांपर्यंत होतें. सिंहासनापासून चार फुटांच्या अंतरावर दोहों बाजूंस दोन छत्र्या उभ्या केलेल्या होत्या. या छत्र्यांच्या दांड्या ८ फूट उंचीच्या असून हिरे, माणकें व मोत्यें यांनीं त्या मढविलेल्या होत्या. छत्र्या तांबड्या किनखाबाच्या केलेल्या असून सभोंवार मोत्यांच्या झालरी सोडलेल्या होत्या.

हें सिंहासन तयार करण्यास तैमूरलंगानें सुरवात केली होती, व तें शहाजहान बादशाहानें पुरें केलें. बादशाहाच्या जवाहीरखान्याचा हिशेब ठेवणारे, व या सिंहासनाच्या संबंधानें खर्च करणारे यांनीं या सिंहासनास एक हजार सत्तर कोटि रुपये खर्च झाला असें लिहून ठेविलेलें आहे. ट्राव्हरनियर नांवाचा फिरस्ता औरंगजेबाचे कारकीर्दीत दिल्ली एथें होता त्यानें वर लिहिल्याप्रमाणें वर्णन केलेलें आहे. नादिरशाहानें इ० स० १७३९ त दिल्ली शहर लुटून नेलें. त्या वेळीं तो हें सिंहासन घेऊन गेला. हल्लीं या सिंहासनाचा अवशिष्ट राहिलेला फारच थोडा भाग इराणचे शाहाचे जामदारखान्यांत आहे असें म्हणतात.

औरंगजेब बादशहाचें चरित्र.—उत्तरभाग.

# प्रवास.

**कोऽतिभारः समर्थानां? किं दूरं व्यवसायिनाम्?**
**को विदेशः सविद्यानां? कः परः प्रियवादिनाम्?**

सांप्रत या पृथ्वीवर मानवजातीस जें एवढें वैभव प्राप्त झालें आहे, तें प्रवासाच्या योगानें झालें आहे असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. जर प्रत्येक राष्ट्र आपआपली सीमा न उल्लंघितां आपल्याच ठायीं स्वस्थ बसतें, व दुसऱ्यास आपल्या मुलखांत येऊं न देतें, तर जगाच्या आद्यस्थितींत आणि सांप्रतच्या स्थितींत फारसा फेर पडता ना. प्रायः सर्व राष्ट्रांची मूळची समजूत अशीच असे कीं, जें काय आपलें आहे तें आपणासच असावें, त्यांत परका मनुष्य भागीदार नसावा. हाच हेतु मनांत धरून स्पार्टन लोकांचा लैकर्गस म्हणून राजव्यवस्थापक होऊन गेला त्यानें तद्देशीय लोकांस परस्थ लोकांशीं व्यापार करण्याची अगदीं बंदी करून टाकिली होती, व तोच प्रकार अजूनपर्यंतही पुष्कळ अंशीं चीन, जपान वगैरे राज्यांत दृष्टीस पडतो. पण हे मनुष्यानें केलेले अटकाव कोठपर्यंत चालणार? अर्वाचीन तत्त्वज्ञानी लोकांनीं असा सिद्धांत केला आहे कीं जगाच्या रहाटीचा एकंदर रोंख सुधारणुकीकडे आहे; त्या रोंखाप्रमाणें, इतके दिवसपर्यंत सर्व राष्ट्रांत जे जे कोणीं प्रतिबंध करून ठेविले, ते ते एकामागून एक सर्व मोडत जाऊन, हल्लीं तर त्यांचा प्रायः लयच झाल्यासारखा झाला आहे. असा या प्रतिबंधांचा लय होण्यास अनेक गोष्टी कारणीभूत होतात. त्यांतील मुख्य अशा पाहूं गेलें असतां जिज्ञासा व लोभ या दोन होत. सर्व लोक आप-

आपल्या मुलखांत ज्या ज्या गोष्टी पहातात तेवढ्यांनीं त्यांची तृप्तता न होऊन, इतर राष्ट्रांत काय चाललें आहे, तेथील लोक कसे काय आहेत वगैरे पहाण्याची साहजिक जिज्ञासा त्यांच्या मनांत उत्पन्न होते. मग ती जिज्ञासा तृप्त करण्याकरितां ते लोक परराष्ट्रांत जातात. हें एक झालें. दुसरें असें कीं, कोणी प्रतापशाली राजा आपल्या देशावर सार्वभौमत्व पावून इतर देशही आपल्या सत्तेखालीं आणावे अशी महत्त्वाकांक्षा मनांत धरतो व इतर राष्ट्रांशीं बळेंच वैर साधून त्यांजवर स्वाऱ्या करतो. या दोहों कारणांच्या -विशेषतः दुसऱ्याच कारणाच्या-योगानें, जे देश एकमेकांपासून हजारों कोसांच्या अंतरावर असतात व ज्या देशांचें दळणवळण होण्याची कांहीं कालापूर्वीं कोणाच्या मनांत कल्पनाही आली नसेल, त्यांचा परस्पर निकट संबंध होऊन राहिला आहे.

प्रवासास आवश्यक गोष्ट म्हटली म्हणजे धारिष्ट होय. ज्या लोकांस धारिष्ट नाहीं; ज्यांचे विचार आपलें कुटुंब व आपला देश यांहून पलीकडे कधीं धजावतच नाहींत, त्यांच्या मनांत इतर देशीं प्रवास करण्याची बुद्धि येईल कोठून ? जगाच्या इतिहासांत पाहिलें असतां असें आढळतें कीं, ज्या लोकांत धारिष्ट विशेष तेच संपात्तिमान् व ज्ञानसंपन्न असे झाले. इसवी सनाच्या पूर्वीं सुमारें हजार वर्षांमागें एशियामैनर देशांत फिनिशियन म्हणून मोठे धारिष्टवान् लोक होते. त्या लोकांनीं, त्या वेळेस जेवढा जगाचा भाग माहीत होता, तेवढ्याशीं व्यापार ठेविला होता. त्या वेळेस नाविककला फार अपूर्ण दशेंत असतांही, ते लोक, सर्व भू-

मध्यसमुद्र धुंडाळून, ज्या अटलांटिक महासागरास त्या वेळेस लोक पृथ्वीची सीमा समजून त्यांत फार लांबपर्यंत जाण्यास भीत असत, त्या महासारांत देखील संचार करूं लागले. त्यांनीं ब्रिटिश बेटें—जीं त्या वेळच्या लोकांस फारशीं ठाऊक देखील नव्हतीं—व आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरचीं बेटें, यांशीं बराच व्यापार चालविला होता. सारांश, ते लोक धारिष्टवान् असल्यामुळें त्या वेळीं राष्ट्र धनाढ्य व विद्यासंपन्न म्हणून गाजत होतें. त्यांनींच कार्थेज, टायर इत्यादि नामांकित शहरें वसविलीं. त्यांच्या मागें कार्थेजच्या लोकांनींही त्यांचा धारिष्टाचा कित्ता बराच उचलला होता.पण पुढें ते लोक राज्याचे चुरशीस लागल्यामुळें त्यांचें पहिलें तेज कमी होऊन शेवटीं त्यांचा अगदीं मोड झाला. त्याहीपुढें जीं ग्रीसचीं अनेक संस्थानें एकामागून एक अशीं वैभवास चढलीं व पुढें रोमन लोकांचें सर्व जगावर जें स्वामित्व झालें, त्या सर्वांचें बीज तरी धारिष्ट होय.

साहस, उद्योग, वगैरे गुणांचा जसजसा लोकांत ऱ्हास होऊं लागतो तसतशी त्या लोकांची बुडती कळा आलीशी समजावी. असो; हल्लीही इंग्रज लोकांच्या उत्कर्षास हेंच साहस मुख्य कारण झालें आहे. सन १४९२ या वर्षी कोलंबसानें मोठ्या अडचणी सोसून अमेरिकाखंडाचा शोध लावला. तेव्हांपासून यूरोपामध्यें साहसाचा आवेश सर्व लोकांचे मनांत भरला. पुढें लौकरच पोर्तुगीज लोकांनीं हिंदुस्तानाशीं व्यापार करण्यास व तेथील मुलूख काबीज करण्यास आरंभ केला. त्यांच्या मागोमागच डच, इंग्रज, फ्रेंच वगैरेही लोक आले.

पुढें इंग्रज लोकांस एथचें सार्वभौमत्व प्राप्त झालें. याप्रमाणें यूरोपांतील लोकांचा उत्कर्ष, त्यांचें प्रवास करण्याचें जें साहस, त्यामुळें झाला; व अजूनही किती होईल हें सांगवत नाहीं. कां कीं, त्यांचे नवे नवे शोध प्रतिवर्षीं चाललेच आहेत. या वर्षीं कोणी जहाजें घेऊन आर्टिक महासागरांत ध्रुवाजवळचे प्रदेश पहावयास गेला, पुढच्या वर्षीं कोणी मंगोपार्कासारखा धैर्यवान् पुरुष निर्जन व भयाण अशा आफ्रिकेच्या मध्यभागच्या प्रदेशांत गेला, कोणी नवीं बेटें शोधून काढण्याकरितां अफाट अशा पासिफिक महासागरांत गेला, अशा गोष्टी दरवर्षास प्रत्यक्ष होत आहेत. तेव्हां अशा साहसी पुरुषांचें ठिकाण जें यूरोपखंड, तें हल्लीं संपत्तीचें व विद्येचें भांडार झालें आहे यांत नवल काय?

वरील गोष्टी, मोठमोठ्या राष्ट्रांची स्थिति एकंदरींत पाहतां झाल्या. पण नुसत्या मनुष्याविषयीं पाहिलें तरी प्रवासापासून केवढे नफे होतात! सर्वांस अनुभवावरून हें तर ठाऊकच आहे कीं पुष्कळ फिरलेला मनुष्य प्रवासामुळें मोठा हुशार होतो. त्यानें अनेक प्रकारचे प्रसंग काढलेले असतात, हजारों गोष्टी स्वतः पाहिलेल्या असतात, व तशाच पुष्कळ ऐकिलेल्याही असतात, यामुळें तो मनुष्य हरएक कामांत वाकबगार होतो. हे तर केवळ व्यावहारिक नफे झाले. पण जो तत्त्ववेत्ता आहे, किंवा तशा प्रकारची केवळ स्फूर्ति ह्मणून ज्याला आहे, सहृदय कवि—कीं ज्यास सृष्टि चमत्कारमय व आनंदमय भासते,—त्यास तर देशाटनापासून मोठे अमूल्य

लाभ आहेत. प्राचीन ग्रीक लोकांतील पुष्कळ मोठमोठे विद्वान् पुष्कळ देश हिंडले होते. त्यांचा पहिला जो इतिहासकर हिराडोटस तो एशियामैनर, मिसरदेश वगैरे मोठमोठे देश हिंडला होता; व त्या योगानें त्यानें जें ज्ञान संपादिलें त्याच्यामुळें तो एवढा विख्यात ग्रंथकार झाला. त्याप्रमाणेंच सोलन, लैकर्गस म्हणून जे राज्यव्यवस्थापक झाले त्यांनीं देखील आपलें ज्ञानाचें कोठार प्रवासांतच सांठविलें. लैकर्गस तर हिंदुस्तानापर्यंत देखील आला होता असें कितीएक इतिहासकार म्हणतात. त्याचप्रमाणें आमच्या हिंदु लोकांतही जे मोठमोठे विद्वान् होऊन गेले तेही फार प्रवास केलेले असावे यांत संशय नाहीं. सर्व कवींचा मुकुटमणि जो कालिदास तोही मोठा प्रवासी होता असें ह्मणतात; व या गोष्टीस हें एक मोठें प्रमाण आहे कीं, ज्या वेळीं आतांप्रमाणें नकाशे वगैरे साधनें नव्हतीं, त्या वेळेस त्यानें आपल्या मेघदूतनामक अतिसुंदर काव्यांत मेघास जो मार्ग रामगिरीपासून तों थेट अलकापुरी म्हणजे हिमालय पर्वताचें कैलास शिखर तेथपर्यंत सांगितला आहे, तो अगदीं बेचूक आहे. शिवाय ह्या काव्यामधील पर्वतांचें, नद्यांचें वगैरे जें सर्व वर्णन दिलें आहे तें तरी, तीं स्थलें कवीनें स्वतः पाहिल्यावांचून इतकें उत्कृष्ट लिहिलें असेल, हें म्हणणें नीट दिसत नाहीं. अर्वाचीन कालांत जर्मनी देशांत एक हंबोल्ट म्हणून महापंडित होऊन गेला हा तर पृथ्वींतील चारी खंडें हिंडला. व ज्या हिमालय पर्वताच्या शिखराची आह्मांस एथल्या एथें देखील पुरी माहिती नाहीं, त्यावर स्वतः जाऊन त्यानें तेथील सृष्टिचमत्कार आपल्या "कासमस्"

नांवाच्या प्रख्यात ग्रंथांत लिहून ठेवले आहेत. यावरून त्या पंडिताची जिज्ञासा व प्रवासाविषयींचें साहस हीं स्पष्ट दिसून येतात.

हे गुण प्राचीन हिंदु लोकांत मुळींच नव्हते असें जरी म्हणतां येत नाहीं, तरी कालांतरीं त्यांचा लोप झाला हें स्पष्ट आहे. भर्तृहरीनें आपल्या एका शतकांत म्हटलें आहे कीं, " किं सुखमप्रवासगमनम् " सुख काय ?—तर प्रवासास न जाणें. आणि हाच अर्वाचीन हिंदु लोकांच्या एकंदर मनाचा रोंख दिसतो. यापासून देशाचें किती अहित झालें आहे हें सर्वांस माहीतच आहे. त्यावर विस्तार करावा असें नाहीं. हल्लीं तर प्रवासाचे श्रम म्हटले ह्मणजे नाहींतसेच झाल्यासारखे झाले आहेत. तरी प्रवासापासून मनावर होणारे जे सद्विकार ते तरी निदान होण्यास कांहीं प्रतिबंध नाहीं. सध्यां हिंदुस्तानभर व सर्व पृथ्वीवर हवें तिकडे जाण्यास लोखंडी सडका व आगगाड्या झाल्या आहेत. तर अशी प्रवास करण्याची अत्युत्कृष्ट संधि तरी न गमावतां जे आमचे लोक यापासून आपला नफा करून घेऊं पाहतील त्यांस तो पुष्कळ होण्यासारखा आहे.

विष्णुशास्त्री चिपळूणकर—किरकोळ लेख.

---

# मनुष्याचें आटोकाट ज्ञान.

( हा पुढील मनोरंजक लेख जेन टेलर नांवाच्या विद्वान् व चतुर ग्रंथकर्त्रीचा आहे. इंग्रज लोकांच्या स्त्रियांत विद्येचा प्रचार कितपत असतो याचा साक्षात् अनुभव आपणास घडणें अशक्य. यास्तव आमच्या जिज्ञासु व मर्मज्ञ वाचकांस पुढील मासला सादर केला आहे. त्यावरून त्यांच्या ज्ञानाची योग्यता त्यांस सहज

कळून येईल. तसेंच स्त्रिया ज्ञानसंपन्न झाल्या असतां देशास केवढा उपयोग व केवढें भूषण होण्यासारखें असतें ही अत्यंत महत्त्वाची गोष्टही खालच्यासारख्या लेखांनीं जशी सुज्ञांच्या मनावर ठसेल तशी शुष्क पांडित्याच्या शंभर निबंधांनीं ठसणार नाहीं हें खचीत. ]

आपलें सर्व वय विद्याभ्यासांत खर्चून जो परमज्ञानी झाला असा कोणी एक अतिवृद्ध महापंडित हळहळून आपणाशीं ह्मणतोः—

" अहो, मनुष्याचें ज्ञान फार झालें तरी तें किती अत्यल्प ! मीं आपला सारा जन्म ज्ञानसंपादन करण्यांत घालविला ना ? पण इतकें करूनही मला समजतें काय ? सृष्टीच्या रहस्यांचा खुलासा लावण्याची उमेद धरून मी खोल खोल विचारांत जों जों शिरूं लागतों, तों तों माझी बुद्धि अगदींच गुंग होऊन मला कांहींच कळेनासें होतें. पहिल्यापहिल्यानें माझी मति कांहींशी चालते खरी. पण माझें निश्चित ज्ञान असें तेवढेंच; त्यापुढें नुसत्या कल्पनाच बांधाव्या लागतात. एकूण अज्ञानदशेपेक्षां सज्ञानदशेंत मोठा विशेष म्हटला म्हणजे एवढाच कीं, सृष्टिकर्त्याच्या अपार योजनेचें आकलन होण्यास मनुष्याची बुद्धि किती पंगु याचा तींत असल्यानें पूर्णपणें सिद्धांत होतो !

" आतां, सूर्याचें प्रमाण व ग्रहांचीं अंतरें हीं मला काढतां येतात, तसेंच त्यांचे वेध घेऊन त्यांच्या गति वर्तविणें, व मनास थक्क करणाऱ्या अशा त्यांच्या प्रदक्षिणांचे नियम सिद्ध करणें या गोष्टीही मला अगदीं सहज आहेत, हें सर्व खरें. परंतु त्यांची रचना कशी काय आहे, त्याजवर प्राणी वास करितात कीं नाहीं, करीत असले तर त्यांची

जीवनस्थिति व राहण्याच्या सोयी कोणत्या प्रकारच्या आहेत, इत्यादिविषयीं माहिती माझी व अडाणी कुणब्याची सारखीच. पण हें फार दूरच्या अशा अंतरांतील गोलाविषयीं झालें. ज्या पृथ्वीवर मी खुद्द राहतों तिच्या सृष्टिव्यवस्थेविषयीं तरी मला कितपत माहिती आहे ! ज्या वायुजलादिकांस मूलद्रव्यें समजून ' पंचमाहाभूतें ' अशी संज्ञा पूर्वापारपासून लोक देत आले, त्यांचेंही पृथक्करण करून त्यांच्या घटकावयवांस मीं नांवें दिलीं, हें खरें; पण अग्नीची दहनक्रिया कशी चालते, किंवा जलास प्रवाहित्वधर्म कशामुळें आला आहे, इत्यादि गोष्टींचें उपपादन माझ्यानें करवेल काय ? अग्नि व उदक हीं वस्तुतः काय आहेत हा विचार सुद्धां कधीं मनांत न आणतां सर्व जग त्यांचें सेवन करितें, त्यांस वरील गोष्टींचा उलगडा पाडण्यास जशी मोठीच पंचाईत येऊन पडेल त्याचप्रमाणें मलाही होतें. माझी कुशाग्रबुद्धि व तत्त्वज्ञता यांची एथें यत्किंचितही गति न होतां, सारी माझ्यापाशींच राहते. पदार्थ निराधार असला कीं, तो जमिनीवर पडायचाच हा नियम सर्वत्र मी पाहतों; व शास्त्रकारांच्या उपपत्तीवरून मला असें समजलें आहे कीं, हें गुरुत्वाकर्षणाचें फळ होय. पण हें समजूनही मला नवीन तें काय कळलें ! ज्यास पूर्वीं मी ' पतन' ह्मणत होतों त्यासच आतां, ' आकर्षण ' म्हणतों, एवढाच काय तो फरक. अवघ्या पदार्थमात्राची ज्या अतर्क्य व अदृश्य सूत्राच्या योगानें एका केंद्राकडे गति होत आहे, त्याच्या स्वरूपाचा बोध वरील शब्दानें मला यत्किंचित् तरी होतो काय ? सृष्टिविषयक शास्त्रांत निष्णात झाल्यामुळें

प्राणिवर्ग, उद्भिज्जवर्ग व खनिजवर्ग असे तीन मुख्य विभाग, तशाच अवांतर जाति व उपजाति, या सर्वांची निवाडानिवड मला करितां येते; पण इतके परिश्रम करूनही हिरव्या गवताच्या एका पातेचा तरी पोषणप्रकार माझ्यानें सांगवेल काय? मीं फार फार सूक्ष्म विचार केला तरी सृष्टिकर्त्या चतुर कारागिराचें जें अद्भुत व सुंदर कलम वनपुष्पांस चित्रविचित्र रंगांनीं रंगवितें त्याचा मला शोध लागेल काय? तसेंच माणिकावर व पाचेवर जे रंग झळकतात, व तऱ्हेतऱ्हेच्या शिंपांवर ज्या लकेरी मारतात त्यांचें कारण तरी आजपर्यंत विचार करून मला काय उमगलें आहे! इतर प्राण्यांचें चातुर्य जें माझ्या नजरेस येतें त्यास मी उपजतबुद्धि म्हणतों व मनुष्याच्या विचारशक्तीशीं ती कोणकोणत्या जनावरांच्या ठायीं किती किती मिळूं पहाते या विषयींही माझा तर्क चालतो. परंतु एकंदरींत पाहतां, पशूंस माझे मनोधर्म जितपत कळतात तितपतच त्यांचेही मला कळतात असें म्हणणें भाग येतें. जेव्हां पक्ष्यांचा थवा आकशांत घिरट्या घालतांना मी पाहतों, किंवा एकाद्या दूरच्या प्रदेशाकडे त्यांचें कळप निघालेले असतात, तेव्हांचे त्यांचे संकेत व शब्द, पंडितांच्या भाषा जशा एकाद्या अक्षरशून्य मजुराला, त्याप्रमाणेंच मलाही ते अत्यंत गूढ होत. धर्मशास्त्रावरील ग्रंथांत जितकी त्यांची गति तितकीच माझीही त्यांच्या वर्तननियमांत व व्यवस्थेंत होय.

"हरहर! एकूण ज्ञानप्राप्तीस्तव सर्व जन्मभर जो मीं एवढा शीण केला, त्यासारखें त्याचें सार्थक तें मला काय झालें? माझी बुद्धि किती पंगू, अज्ञान केवढें थोर, या

गोष्टीचा पूर्ण प्रत्यय माझ्या मनास येऊन माझें क्षुद्रत्व मला स्पष्टपणें भासूं लागलें, इतकेंच कीं नव्हे? शिव शिव!! मनुष्याच्या अंगीं पराकष्ठेची विद्वत्ता आली, तरी आपला ज्ञानगर्व मिरवण्यास त्यास किती अत्यल्प अवकाश असतो! त्याची बुद्धि वस्तुतः इतकी कोती असून व संपादिलेलें ज्ञानही तसेंच अपुरतें असून, नसत्या भूषणाचा त्यानें गर्व वाहवा व आपली योग्यता मोठी मानावी हा त्याचा केवढा मूर्खपणा!!"

विष्णुशास्त्री चिपळूणकर.—किरकोळ लेख.

---

# वजिरातीच्या वस्त्रांचा समारंभ.

[ महादजी शिंदे यांनीं पुणें मुक्कामीं श्रीमंत सवाई माधवरावसाहेब पेशवे यांस दिल्लीच्या बादशाहापासून संपादन केलेलीं वजिरातीचीं वस्त्रें अर्पण केलीं. त्या प्रसंगाचें हें वर्णन आहे. ]

दुसरे दिवशीं दरबारचीं बलावणीं सर्वांस झालीं. लहान-थोर मुत्सद्दी व कारभारी व मानकरी व पागे व पथके तमाम सरदार दरबारास आले; व महादजी शिंदे वानवडीहून वाडयांत आले. सकळ दरबार झाला आहे. त्या समयीं महादजी शिंदे यांनीं सर्वांस सांगितलें कीं, "दिल्लीचे बादशाहा यांनीं सरकारच्या नांवें वजिरातीचीं वस्त्रें वगैरे दिलीं तीं सरकारांत प्रविष्ट करावयाचीं; त्याचा विचार सर्वांनीं करून सुमुहूर्त पाहून निश्चय ठरवावा. म्हणजे त्याप्रमाणें समारंभ करावयाचा बेत ठरवूं." असें सर्वांनीं ऐकतांच नाना, तात्या व वरकड कारभारी यांनीं रुकार दिला,

"चांगलें आहे." त्या समयीं जोशी बलावून, दिनशुद्धि चांगली पाहून, श्रीमंतांचे राशीस चंद्रबळ उत्तम व आणखी दोन चार ग्रह अति सुंदर, श्रीमंतांस मोठे अनुकूल, असा दिवस पाहून त्या दिवशीं मरातब घेण्याचा निश्चय ठरवून पाटीलबोवा यांस सर्वांनीं रुकार दिला.

मग त्या दिवशीं महादजी शिंदे यांनीं आपले लष्करांत श्रीमंत बसावयाची जागा करून मखमाली डेरे देऊन मखमाली बिछाईत घालून, कळवंतिणीचे नाच उभे करून, शिंदे श्रीमंतांस न्यावयास पुण्यास येऊन त्यांनीं विनंति केली. तेव्हां स्वारी सरकारची तयार होऊन निघाली.

बरोबर तमाम मानकरी, शिलेदार, सर्व मुत्सद्दी, तात्या, नाना, आप्पा बळवंत, अमृराव पेठे, रामचंद्र गणेश, विसाजीपंत बिनीवाले, बाजीपंत अण्णा, नारोपंत चक्रदेव, महादजीपंत गुरुजी; ब्राह्मण सरदार—पटवर्धन, विंचुरकर, गणेशपंत बेहरे, बहिरो अनंत; राजे बहादर; मराठे सरदार—अक्कलकोटवाले भोसले, घोरपडे, निंबाळकर, जाधव, भोइटे; असा सारा फौजेचा जमाव करून, श्रीमंतांची स्वारी पुण्याहून निघाली.

त्या वेळीं खासा स्वारी अयन्याच्या अंबारींत बसून चालली. खवासखान्यांत आप्पा बळवंत व पेठे बसले. श्रीमंतांच्या मागें नाना फडणीसही अंबारींत बसून चालले. तसेंच तात्या व महादजी शिंदे अंबारींत बसून [ चालले, व ] त्यांच्या मागून झाडून सरदार निघाले. खाशी स्वारी सरकारची चालत असतां खासगी जिलीब पुढें चालली.

असे शिंदे यांजकडील जिलबीपुढें बल्लमें[1] वगैरे चालतात. त्यापुढें भालदार, चोपदार, सरकारचे मिरधे, पुढें हाका मारून सांगतात, त्यांच्यापुढें कोतवालघोडे, अशा थाटानें स्वारी वानवडीस जाण्यासाठीं निघाली.

ती स्वारी शनवारांतून वाडा डावा घालून आदितवारांतून नाकझरी उतरून तहत वानवडीपावेतों आघाडी स्वारीची व रास्ते यांचे पेठेपावेतों एकसारखा स्वारीचा थाट चालला. अशी स्वारी जात असतां लष्करांत दाखल झाली.

जेथें बसावयाची जागा[2] केली होती, तेथें जाऊन श्रीमंत व सर्व मंडळी, मानकरी, मुख्य कारभारी, लहानथोर सरदार, आपआपल्या इराद्याप्रमाणें[3] कचेरीच्या डेऱ्यांत जाऊन बसले. नाच होत आहे. असा दोन तीन घटका नाच झाला. नंतर महादजी शिंदे यांनीं दिल्लीहून बादशही वजिरातीचे मरातब आणिले होते, तीं भूषणें सारीं कचेरीस आणविलीं. नंतर श्रीमंतांपुढें ठेविलीं. नंतर मंदील पठाणी तऱ्हेचा बांधिलेला होता, तो डोकीस घातला. तसाच अंगांत जामानिमा तमामी, पायांत विजार घालून कमरेस पटका बांधून श्रीमंत खालीं बसले. मग मस्तकीं शिरपेंच व तुरा व कलगी मंदिलावर बांधिली. हातांत मनगटी, पोंच्या, भुजबंद, गळ्यांत मोत्यांचे व नवरत्नांचे हार घातले. कानांत चौकडा घातला. पायांत घालण्या-

---

१ बल्लम=एक प्रकारचा भाला किंवा बर्ची; तो भाला धरणारे.

२ या समारंभाकरितां शिंद्यांनीं संगमावर तयारी केली होती. ग्रांट डफ.

३ इरादा=इलाखा, हक्क, योग्यता.

करितां बादशाही जोडा आणिला होता, तो पाटिलबुवा यांनीं पुढें ठेविला. आणखी, मोरचल शिंदे यांनीं हातांत घेऊन, श्रीमंतांवर वारून, पाठीमागें खिसमतगार उभे होते त्यांच्या हातीं दिलें. मग नालकी व कांहीं मरातब आणून पुढें ठेविलें. नंतर "दिल्लीस वजिरातीचा कारभार करावयाचा तो श्रीमंतांचे तर्फेनें महादजी शिंदे यांनीं करावा." अशी विनंति शिंदे यांनीं केली असतां सर्वांच्या मनास येऊन "उत्तम आहे" असे सर्वांचे रुकार आले. नंतर हरिपंत तात्या यांनीं विनंति केली कीं, "पाटिलबोवा यांस वजिरातीच्या गुमास्तगिरीचीं वस्त्रें, नालकी वगैरे द्यावयाचीं तीं सरकारची स्वारी वाड्यांत दाखल झाल्यानंतर तेथें द्यावीं." ही गोष्ट सर्वांचे मनास आली. तेव्हां शिंदे यांनीं सर्वांस पोषाख दिले. शिंदे यांची अंबारी एक खांबाची होती ती त्यांनीं सरकारांत नजर केली. मग पानसुपारी, अत्तरगुलाब, हारगजरे वांटिले.

मग सरकारची स्वारी पुण्यास यावयास निघाली. तेव्हां मशाली लावून, हत्तीवर हवया लावून श्रीमंत नालकींत बसून निघाले. त्या समयीं सरकारचे राजमंडळाचे मानकरी व सरदार होते ते नालकीबरोबर चालले नाहींत[१]. अघाडीपिछाडीस चालले व सरकार-चाकर होते ते मात्र नालकीसमागमें चालिले. महादजी शिंदे व हरिपंत तात्या हे नालकी धरून दोहींकडे चालले. बादशाही पोषाग अंगावर

१ सातारच्या महाराजांच्या तर्फेनें आलेले सरदार वगैरे शिंद्यांनीं या समारंभाकरितां उभ्या केलेल्या बादशाही तंबूंत पेशव्यांबरोबर गेले नाहींत व त्यांनीं त्यास नजरही केली नाहीं.—ग्रांट डफ.

होता त्यासुद्धां सरकारची स्वारी नालकींत बसली. एकीकडे मोरचळ, एकीकडे चवरी, पुढें जिलीब बादशाही मरातब चालले. अशी स्वारी शहरांत येई तों चार घटका रात्र झाली. तेव्हां मशाली, हवया लावून त्या उजेडांत बादशाही डौलानें चालले, असे येऊन वाड्यांत दाखल झाले. नंतर बादशाही पोषाग अंगावर होता तो काढून नवा पोषाग घेतल्यानंतर स्वारी सरकारची जाऊन गादीवर बसली. तेव्हां सारे मानकरी व सरदार व पागे व सरकारचे कारभारी व मुत्सद्दी व शिलेदार असे सर्वांचे मुजरे व नजरनजराणे झाले. नंतर महादजी शिंदे यांस वजिरातीच्या गुमास्तगिरीचीं वस्त्रें द्यावयाचीं तीं तेथें वाड्यांत समक्ष दिलीं. आणखी मरातब बादशाही द्यावयाचे ते दिले. सर्वांस पानसुपारी, अत्तरगुलाब देऊन सर्वांस निरोप दिला. महादजी शिंदे यांस निरोप झाला. सर्व लोक आपापले ठिकाणीं गेले व महादजी शिंदेही आज्ञा घेऊन आपले लष्करांत गेले. याप्रमाणें बादशाही वजिरातीचा समारंभ झाला.

पेशव्यांची बखर.

---

# समुद्रावरील प्रवास.

मुंबईहून निघाल्यानंतर २७ दिवसांत ४।५ ठिकाणीं मात्र आम्हांला भूमीचें दर्शन झालें. एरवीं खालीं अगाध समुद्र आणि वरतीं अनंत आकाश आमच्या नजरेस पडत होतें. संध्याकाळच्या वेळेस आम्ही जेव्हां डेकावर बसत होतों तेव्हां समुद्राची आणि आकाशाची अपूर्व आणि अनिर्वचनीय शोभा आणि महत्त्व पाहून माझ्या मनांत किती प्रका-

र्चे विचार येत असत हें सांगतां येत नाहीं. एकीकडे सूर्य अस्ताला जात आहे, त्याची सायंकालीन कोमल प्रभा अनंत नीलनभोमंडलांत जिकडे तिकडे—विशेषेंकरून पश्चिमेकडे—पसरलेल्या पिंजलेल्या शुभ्र कापसाच्या ढिगासारख्या मेघराशींवर प्रतिबिंबित होऊन आमच्या पुराणांतील काल्पनिक सुवर्णगिरी मेरूचीं शिखरें चोहोंकडे समुद्रांतून आपलीं डोंकीं उचलून आकाशाचें चुंबन घेत आहेत कीं काय अशी भ्रांति होत असे! किंवा समुद्रोदरांत कल्पिलेली कृष्णाची सुवर्ण-द्वारका[1] अथवा रावणाची लंका माझ्यासमोर आहे कीं काय असें वाटत असे! सूर्यास्त झाल्यानंतर बंगाल्यांतील पडदपोशी स्त्रिया जशा हळूच पडदा पलीकडे सारून लोकांस भीत भीत खिडक्यांतून

१. मी लहान होतें तेव्हां आमचे वडील सुमारें १०।११ महिनेपर्यंत कच्छाजवळ असलेल्या द्वारकेंत समुद्रकिनाऱ्यावर राहिले होते. तेथें कधीं कधीं संध्याकाळच्या वेळेस समुद्रकिनाऱ्यावरील शुभ्र वाळवंटावर आम्ही फिरावयास जात होतों. आहा! ते किती सुखाचे दिवस होते! तसे दिवस या जन्मांत पुनः यावयाचे नाहींत! माझ्या बालकस्वभावाला अनुसरून मी त्या वाळवंटावर किती कवड्या, शिंपल्या, दगड, धोंडे गोळा करून ओंटींत भरून घरीं नेत असें, आणि मला त्या वेळेस किती आनंद होई म्हणून सांगूं! त्या वेळेस आतांसारखे माझे डोळे समुद्राची किंवा आकशाची शोभा पाहण्यास गुंतत नव्हते. माझीं आईबापें, बहीण आणि भाऊ हीं सर्वजण एकीकडे गोष्टी सांगत फिरत असत आणि मी त्यांच्या पुढें आणि मागें घोंटाळत दगड, धोंडे, काय हातीं लागेल तें, वाळवंटांतून गोळा करीत असें. मला वाटे, माझीं आईबापें आणि बहीणभावंडें फार अरसिक आहेत! कां? तर माझ्यासारखीं तींही शंख, शिंपल्या, दगड, धोंडे गोळा करीत नाहींत म्हणून!!!

डोकावून पाहतात आणि पुनः झटकर घरांत आपलें तोंड लपवितात, त्याप्रमाणें वायुवेगाच्या परवश होऊन आकाशांतून इकडे तिकडे फिरणाऱ्या मेघरूपी पडद्यांच्या अंतराळांतून एकापाठीमागून एक अशा पुष्कळ तारका गगनसौधावरून आमच्याकडे डोकावीत असत, आणि पुनः मेघांच्या आड आपलें तोंड लपवीत असत ! एकाद्या वेळेस आकाश निरभ्र असलें म्हणजे असंख्य नक्षत्रें दिसूं लागत त्या वेळेस यमुनेच्या नीलजलप्रवाहांत भक्तांनीं वाहिलेलीं शुभ्र जाईचीं पुष्पें चोहोंकडे पसरलेलीं आहेत कीं काय असें वाटत असे ! आणि त्या वेळेस चंद्रोदय झाला असला तर त्या शोभेला पारावाराच नसे ! खालून अगाध समुद्राचा विस्तीर्ण वर्तुळाकार एक भाग आणि वर स्वच्छ नभोमंडळाचा वर्तुळाकार दुसरा भाग असे दोन्ही जुळलेले दिसत असून त्यांत मोत्यांसारख्या चोहोंकडे पसरलेल्या तारका

---

एक दिवस द्वारकेंतील पंड्यांनीं ( तीर्थपुरोहितांनीं ) अशी गप्प उठविली कीं, आज कपिलाषष्ठी आहे, या योगास आज संध्याकाळीं कृष्णाची समुद्रांत बुडून राहिलेली सोन्याची द्वारका भक्तजनांस दर्शन देण्याकरितां वर येणार आहे; तेव्हां ज्यांस तिचें दर्शन घ्यावयाचें असेल त्यांनीं समुद्रतीरावर यावें ! त्याप्रमाणें द्वारकेंत समुद्रकिनाऱ्यावर हजारों भक्तमंडळी जमली. आम्हीही द्वारकादर्शनलालसेच्या परवश होऊन तेथें गेलों. थोडक्या वेळानेंच पश्चिम-गगनप्रांतीं दिननाथ अस्तास जाऊं लागले आणि त्यांची स्वर्णप्रभा वर सांगितल्यासारख्या मेघराशीवर पसरून अत्यंत शोभायमान होऊं लागली. पंड्यांनीं तिकडे बोट दाखवून आम्हांला म्हटलें, "ही पहा सोन्याची द्वारका ! " हें ऐकून पुष्कळ भाविक लोकांनीं भक्तिपूर्वक द्वारकेला उद्देशून नमस्कार केले ! त्या पर्वणींत पंड्यांनीं आपल्या पिशव्या चांगल्या भरून घेतल्या ! ! !

जशा आकाशांत, तशींच त्यांचीं प्रतिबिंबें समुद्रजलांत दिसत असून मला असा भ्रम होई कीं, हा आकाश आणि समुद्र अशा दोन भागांनीं जुळलेला एक अति विस्तीर्ण मोत्यांचा शिंपला आहे; आणि यांच्यामध्यें हीं पसरलेलीं मोत्यें आणि शिंपल्याच्या आंतील झळकदार दोन्ही बाजू मला दिसत आहेत! चंद्रप्रभेंत समुद्रांतील उसळणाऱ्या कल्लोळांकडे पाहिलें ह्मणजे समुद्राचें पाणी पातळ झालेल्या चांदीप्रमाणें पांढरें व झळकदार दिसत असे! खवळलेल्या समुद्रांतील कल्लोळांच्या परस्परसंघर्षणानें उद्भवलेल्या फास्फरस नांवाच्या अग्नीच्या ठिणग्या जेव्हां झळकत, तेव्हां आमच्या पूर्वकवींनीं कल्पिलेल्या वडवाग्नीचें प्रकारान्तरानें दर्शन होत असे! अशा त्या अगाध समुद्रामध्यें अविश्रांत कल्लोलध्वनि ऐकून मध्यरात्रीं मी झोंपेंतून जागी होऊन खिडकींतून डोकावून समुद्राकडे पहात असें. आगबोटींतील सर्व मनुष्यें निजल्यानें चोहोंकडे सामसूम, खोलींत अंधेर, (रात्रीं दहा वाजल्यावर कयाबिनींत दिवा ठेवण्याची मनाई असते.) पुढें, मागें जिकडे पहावें तिकडे समुद्र, अशा वेळेस मनुष्याच्या मनाची स्थिति जशी असावी तशीच माझी असत होती. त्या वेळेस माझ्या मनांत या अनंत जगाला सृष्ट करणाऱ्या ईश्वराचें महत्त्व, आपल्या नश्वर परमाणुमात्र वैभवाच्या अहंकारांत गुंग असणाऱ्या मनुष्याचें क्षुद्रत्व, माझी हल्लींची स्थिति, माझ्या आयुष्यांत जें जें घडून आलें त्यांपैकीं मुख्य मुख्य सुखाच्या आणि दुःखाच्या गोष्टी, मी आतां आपला देश सोडून कशासाठीं इतक्या दूरदेशीं जात आहें, पुढें मी कांय

करणार, कोणत्या रीतीनें मीं आपल्या मातृभूमीची सेवा करावी, आणि कदाचित् दैवयोगानें हें जहाज समुद्रांत बुडालें तर माझे सर्व मनोरथ एका क्षणांत कसे बुडून जातील, इत्यादि गोष्टींचा एकसारखा विचार चालत असे.

पंडिता रमाबाई–इंग्लंडचा प्रवास.

---

## आकाशगंगा.

निरभ्र काळोख्या रात्रीं आकाशाकडे सहज पाहिलें असतां एक अंधुक लांबच लांब पांढुरका पट्टा कमानी-सारखा पसरलेला दृष्टीस पडतो. यास आपण आकाशगंगा म्हणतों, आणि युरोपांतील लोक मिल्की वे ( Milky way ) म्हणजे दुग्धमार्ग म्हणतात. या पट्ट्याकडे लोकांचें लक्ष फार प्राचीन काळापासून लागलें असावें ही गोष्ट निर्विवाद आहे. सर्व देशांतील प्राचीन काव्यांत आणि इतर ग्रंथांत या पट्ट्याविषयीं उल्लेख केलेला आढळून येतो. संस्कृत ग्रंथांत तर आकाशगंगेवर नानाप्रकारच्या हृदयंगम उपमा व कल्पना बसविलेल्या वाचनांत येतात. याप्रमाणें हा अंतरिक्षस्थ चमत्कार कवींपासून तों सामान्य जनांपर्यंत सर्वांना पूर्वींपासून फार आल्हाददायक होऊन बसला आहे. अलीकडील ज्योतिषशास्त्रांतील शोधांवरून सुद्धां आकाशगंगेचें महत्त्व कमी न होतां उलट विशेष वाढलें आहे. तें कसें हें पुढील वर्णनावरून कळून येईल.

एरवीं नुसत्या डोळ्यांनीं पाहिलें असतां आकाशगंगा ही प्रकाशाचा एक पट्टा आहे असें वाटतें. पण दुर्बिणीनें

पाहिलें असतां कोटयनुकोटि तारे एकत्र होऊन आकाश-गंगा बनली आहे असें समजून येतें. हे तारे आपणांपासून इतके दूर आहेत कीं, त्यांचा प्रकाश पृथक् पृथक् दिसत नाहीं. त्या सर्वांचा प्रकाश एकवटून येतो म्हणून आपणांस आकाशगंगेचा पट्टा दिसतो. आकाशगंगेतील अत्यंत तेजस्वी चकाकणाऱ्या ताऱ्यांपासून तों अगदीं अंधक दिसणाऱ्या ताऱ्यांपर्यंत प्रत्येक तारा आपल्या सूर्याप्रमाणें प्रचंड सूर्य आहे, इतकेंच नव्हे, तर यांपैकीं पुष्कळ तारे आपल्या सूर्यापेक्षां देखील शेंकडोपट मोठे येतील! तेव्हां असल्या ताऱ्यांचा एवढा मोठा समुदाय म्हणजे अनंत सूर्य मिळून आकाशगंगा झाली आहे, हें समजून आपणांस केवढा चमत्कार वाटतो! त्यांत आणखी आपणांस विस्मयकारक गोष्ट म्हटली म्हणजे ही आहे कीं, एवढा हा आपला प्रचंड सूर्य, पण त्याचीही गणना आकाशगंगेंतील अनंतकोटि व आपणांस सूक्ष्म दिसणाऱ्या ताऱ्यांतच होत आहे!

आकाशगंगेचें सूक्ष्म निरीक्षण केलें असतां असें आढळून येईल कीं, असंख्यात तारे एकत्र दाटीनें मिसळले आहेत, आणि त्यांची ही एक विचित्र रचना झाली आहे! जसजसें आपण आकाशगंगेकडे पाहूं लागावें, तसतसे तारे अधिकाधिक दाट एकत्र जमले आहेत, असें नजरेस येतें. ह्या पट्टयाची लांबी इतकी आहे कीं, ह्याचें आपणाभोंवतीं एक वर्तुळ झालें आहे. तेव्हां हा पट्टा किती लांब असावा हें सांगणें दुरापास्त होय. याची रुंदी सर्वत्र सारखी नाहीं कमीजास्त आहे. या पट्टयांत शेंकडों तारागुच्छ, सहस्रावधि तारापुंज आणि अगणित तारे आहेत! मग,

यांत किती ग्रहमाला आणि काय काय चमत्कार असतील याची कल्पनाही करितां येणार नाहीं हें उघड आहे. जों जों मोठ्या शक्तीच्या दुर्बिणींतून या पट्ट्याकडे पहावें तों तों अनंतकोटि सूर्य आकाशगंगेंत अगदीं खचून भरले आहेत असें पाहण्यांत येतें. बरें, इतकेंही असून आकाशगंगेचा आणखी भाग पलीकडे विश्वविवरांत दिसत असतोच, त्यास सीमा म्हणून नाहींच !

आकाशगंगेंतील तारे आपणापासून किती दूर आहेत हें सांगतां येणें शक्य नाहीं. तसेंच, त्यांचे आकार केवढाले आहेत याचीही कल्पना करितां येणार नाहीं. कितीही मोठी दुर्बीण घेतली, तरी तींतून सुद्धां या ताऱ्यांचीं बिंबें किंचित् देखील मोठीं दिसत नाहींत, किंवा त्यांच्या अंतराची कल्पना होत नाहीं. इतकेंच नव्हे, तर उलट असें मात्र अनुभवास येतें कीं, जों जों मोठ्या दुर्बिणींतून हे तारे पहावयास जावें तों तों ते दूरवर गेले आहेतसे वाटतात !

ज्या अगणित ताऱ्यांच्या दाटीनें आकाशगंगेचा पट्टा आपणांस दिसतो, ते एकमेकांच्या अत्यंत जवळ असावेत असें सहज वाटणार आहे. पण असें मानणें चुकीचें होईल. वास्तविक पाहिलें तर हे तारे एकमेकांपासून कोट्यवधि मैल दूर आहेत. परंतु, त्या सर्वांचें अंतर आपणांपासून परमावधीचें असल्यामुळें ते जवळ जवळ अगदीं चिकटलेले आहेत असे आपणांस भासतात. एखाद्या निबिड अरण्यांतील झाडें दुरून पाहिलीं असतां, तीं अगदीं एकमेकांजवळ आहेत असें वाटत नाहीं काय ? आपला सूर्यही ह्या गंगेंतील अनंतकोटि ताऱ्यांपैकींच एक मध्यमसा तारा आहे.

आणि आकाशगंगेच्या दुसऱ्या एका भागावरून जर आपल्यास सूर्याकडे पाहतां आलें, तर तोही अनंत ताऱ्यांच्या गर्दींत मिसळून गेला आहे असें दिसून येईल. पण, आपल्या मालेमध्यें आणि आकाशगंगेच्या दुसऱ्या ताऱ्यांमध्यें केवढें तरी अंतर आहे ! तेव्हां निदान इतकेंच अंतर तरी आकाशगंगेंतील प्रत्येक ताऱ्यामध्यें असलें पाहिजे. मग एकमेकांपासून भयंकर अंतरावर राहिलेल्या अनंत कोटि ताऱ्यांनीं जी आकाशगंगा झाली आहे, तिनें विश्वाची केवढी जागा व्यापून टाकिली आहे हें कोण सांगूं शकणार ? किंवा याची कल्पना तरी कोणास होणार ?

अंतरिक्षांतील चमत्कार.

---

# ब्रिटन देशांतील राज्यव्यवस्था.

## ( भाग पहिला. )

ह्या देशाचा बहुतेक भाग हल्लीं इंग्लिश लोकांच्या ताब्यांत आहे. त्याचा राज्यकारभार ते कसा चालवितात, हें नेहमींच्या वहिवाटीवरून व इतिहासावरून समजतच आहे. आतां, जेथें आपला मुख्य राजा राहतो, व जेथून ह्या देशाच्या राज्यव्यवस्थेचीं सूत्रें हालतात, त्या इंग्लंड देशाच्या राज्यसत्तेचें संक्षिप्त वर्णन करितों.

इंग्लडची राज्यसत्ता ही राजा, बडे लोकांची सभा, व साधरण लोकांच्या मुखत्यारांची सभा, ह्या तिघांच्या हातीं आहे.

राजा.—नार्मन लोकांनीं इंग्लंड काबीज केल्यापूर्वींचा

प्रकार कसा असेल तो असो; पण त्यांनीं तें काबीज केल्यावर पुढें त्या देशाचा राज्याधिकार वंशपरंपरेनें चालत आला आहे. तो असा.—राजा मरेल आणि त्याला अनेक मुलगे असतील, तर वडिलास गादी मिळावी; जर एक मुलगा आणि एक मुलगी असेल, तर मुलग्याला मिळावी; सगळ्या मुलीच असतील, तर थोरलीस मिळावी; एक मुलगी आणि एक बहीण असेल, तर मुलीस मिळावी; मुलें मुलींच नसलीं तर भाऊ आणि बहिणी, ह्यांत वयानें आणि नात्यानें ज्याचा विशेष हक्क पोंचेल त्यास मिळावी. ह्याप्रमाणें राजाची गादी देण्याची वहिवाट चालू आहे. तथापि योग्य दिसल्यास, हे नियम सोडून वेगळी व्यवस्था करण्याचा अधिकार, पूर्वी सांगितलेल्या दोन सभांस म्हणजे पार्लमेंटास आहे.—राजकुलांतील मनुष्यानें क्याथलिक मताच्या माणसाशीं लग्न लावूं नये; राजकुलांत उत्पन्न झालेल्या कोणाही माणसाचें लग्न राजाच्या अभिप्रायावांचून होऊं नये; ज्याला लग्न कर्तव्य असेल त्यानें आधीं कांहीं दिवस त्याविषयींचा आपला बेत प्रसिद्ध केला पाहिजे. इतकें करूनही तो त्याचा लग्नसंबंध पार्लमेंट सभा नापसंत करील, तर तें लग्न लागावयाचें नाहीं, अशा लग्नाच्या अटी आहेत. राजा लहान असल्यामुळें, अथवा कांहीं कामानिमित्त तो परदेशीं गेल्यामुळें, अथवा दुसऱ्या एकाद्या योग्य कारणामुळें, तो कारभार चालविण्यास असमर्थ असेल तर त्याचें काम करण्यास योग्य मनुष्य नेमण्याचा अधिकार पार्लमेंट सभेस आहे.—राजा प्राटेस्टंट मताचा असला पाहिजे.—राजास

राज्याभिषेक होतो त्या वेळीं सर्व लोकांसमक्ष अशी शपथ घ्यावी लागते कीं, " मी सर्व राज्य पार्लमेंटाच्या कायद्यां-प्रमाणें व देशरीतीप्रमाणें चालवीन; न्याय आणि कायदे ह्यांच्या अनुरोधानें वागेन; प्राटेस्टंट पंथ आचरीन; आणि ह्या पंथाचे उपदेशकांस भजनालयें वगैरे जें कांहीं दिलेलें आहे, तें तसेंच चालवीन." कायदे ठरविणें, ते अमलांत आणणें, न्याय, तह, लढाया वगैरे करणें, पदव्या देणें, हीं कामें राजाच्या नांवानें होतात; तथापि, त्यांपैकीं अगदीं स्वतंत्रपणें असें एकही काम करण्याचा त्याला अखत्यार नाहीं; तो नांवानें मात्र मुख्य अधिकारी आहे. राजाज्ञेवरून प्रधानानें किंवा दुसऱ्या एकाद्या मोठ्या अधिकाऱ्यानें कांहीं कृत्य केलें, आणि त्याचा परिणाम वाईट झाला, तर त्याचा दोष राजाला लावीत नाहींत, तर त्या प्रधानाला किंवा अधिकाऱ्याला लावितात. " राजाच्या हातून कधीं अप-राध घडत नाहीं," अशा अर्थाची जी एक म्हण इंग्लिश लोकांत आहे, ती ह्यावरूनच पडली असावी. सरकारी फौजेस व आरमारास जो पैसा लागतो, त्याची सगळी ल-गाम साधारण लोकांच्या मुखत्यारांच्या सभेच्या हातीं असते. तेणेंकरून राजाला प्रजेच्या अनुमतानें वर्तावें लागतें; व हरएक प्रकारच्या जुलमापासून तिचें संरक्षण करावें लागतें. इंग्लंडच्या राजाच्या अधिकाराविषयीं एका विद्वान् ग्रंथकारानें असें लिहिलें आहे कीं, " इंग्लंडच्या राजास फौजेवर व आरमारावर हुकूम चालविण्याचा अधिकार आहे; परंतु पार्लमेंटच्या संमतीवांचून तो त्यांस नोकरीस ठेवण्यास मुखत्यार नाहीं. तो लोकांस पदव्या देण्यास मुख-

त्यार आहे; परंतु त्या अमलांत आणण्यास पार्लमेंटाचें अनुमत पाहिजे. लढाई करण्याचें ठरविणें हें राजाकडे आहे; परंतु ती चालविणें हें पार्लमेंटाचे संमतीवांचून व्हाव-याचें नाहीं. सारांश, प्रजेवर कर बसविण्याचा व तो वसूल करण्याचा अधिकार राजास स्वतंत्रपणें नसल्यामुळें तो अगडबंब, परंतु स्वतःसिद्ध चलनवलनास असमर्थ, अशा शरीराप्रमाणें आहे. अथवा राजा हें एक मोठें जहाज उत्कृष्ट प्रतीच्या मालानें भरून तयार आहे; त्याला पार्लमेंट सभा हा समुद्र आपणावर येऊं देईल, तरच तें चालेल, नाहींतर खडकावर पडलें राहील, अशी कल्पना केली तरी शोभेल."—पार्लमेंट सभा भरविण्याचा अधिकार राजाला आहे. ती भरण्याबद्दल अगोदर चाळीस किंवा पन्नास दिवस त्याला जाहिरात प्रसिद्ध करावी लागते. प्रसंग पडल्यास राजाच्या संमतीवांचूनही पार्लमेंट सभा भरते. राजाच्या खुद्द खाजगी खर्चाकडे पूर्वीं भारी पैसा दिलेला असे. परंतु व्हिक्टोरिया महाराणी सिंहासनावर बसली, तेव्हां तिच्या खर्चाकडे दरसाल ३८५०००० रुपये नेमणुकीचा ठराव झाला होता. ह्याखेरीज तिच्या कुटुंबांतील मनुष्यांच्या नेमणुकी वेगळ्या आहेत. ही राणी, हिच्यापूर्वीं जो राजा इंग्लंडच्या गादीवर होता, त्याची पुतणी होती. ही इ० स० १८३७ त गादीवर बसली. इ० स० १८४० त हिचें लग्न प्रिन्स आल्बर्ट ह्याशीं झालें होतें. तो इ० स० १८६१ त मरण पावला; ही राणी इ० स० १९०१ या वर्षीं मरण पावली; आणि तिच्या गादीवर तिचे चिरंजीव सातवे एडवर्ड हे बसले. ह्यांच्या राणीसाहेबांचें

नांव अलेगझांड्रा आहे. हे इ. स. १९१० या वर्षी मरण पावले; व त्यानंतर त्यांचे चिरंजीव **पंचम जार्ज** हे गादीवर बसले आहेत. हल्लींच्या महाराणीसाहेबांचें नांव **मेरी** आहे. इनसाफाचीं सात कोर्टें आहेत. ह्या कोर्टांत सर्वांत वरिष्ठ कोर्ट **पार्लमेंट** सभा ही होय. हिची जी सध्यांची रचना आहे, ती ख्रिस्ती शकाच्या चौदाव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास स्थापित झाली. ती, तेव्हांपासून मधला प्रजासत्ताक राज्याचा काळ खेरीज करून, आजपर्यंत एकसारखी चालली आहे. तींत दोन भाग आहेत. पहिला भाग बडे लोकांची सभा; व दुसरा, सामान्य लोकांच्या मुखत्यारांची सभा, बडे लोकांच्या सभेंत ५७६ गृहस्थ आहेत; व लोकांच्या मुखत्यारांच्या सभेंत ६७० लोक आहेत. हे दुसऱ्या भागांतले लोक निवडण्याविषयीं मत देण्याचा अधिकार ५७११३२५ रयत लोकांस आहे.

---

## ब्रिटन देशांतील राज्यव्यवस्था–
### [ भाग दुसरा. ]

बडे लोकांची सभाः—ह्या सभेंत मुख्यत्वें दोन प्रकारचे बडे लोक असतात. ते हे कीं, सरदार अथवा उमराव लोक; आणि धर्माध्यक्ष अथवा पाद्री लोक. ह्या सभेंतील सभासदांच्या जागा वंशपरंपरेनें चालतात. ह्या सभेंत पाद्री लोकांस जागा आहे, ह्याचें कारण, ते धर्माध्यक्ष आहेत हें नव्हे; तर, त्यांच्या कामाच्या संबंधानें त्यांजकडे जमीन पुष्कळ असते, म्हणून त्यांस सभेंत बोलाविण्याचा प्रघात पडून गेला आहे. ह्या सभेंत बसणाऱ्या इंग्लंडच्या

उमरावांच्या संख्येची कांहीं इयत्ता नाहीं. परंतु स्काटलंडचे १६ असावे, असा पूर्वापार पाठ चालत आला आहे. सभेच्या दिवशीं स्वतः जाण्यास न बनल्यास कोणी चांगला मनुष्य आपल्या वतीनें पाठविण्यास सभासदांस अधिकार आहे. ही सभा सर्वांत मोठी न्यायाची कचेरी आहे, असें सर्व इंग्लिश लोक मानितात. स्काटलंडांतील जस्टिशिअर न्यायसभा खेरीज करून, बाकी सर्व न्यायाधीशांचे निवाड्यांवर अपील घेण्यास व त्यांचा योग्य निकाल करण्यास ह्या सभेला अधिकार आहे. तथापि बडे लोक खुद्द बसून न्याय निवडितात असें नाहीं. अपिलें घ्यावीं, पुरावा पहावा, पूर्वीं ज्यांनीं त्याचा फैसला केला असेल, त्या न्यायाधीशांचे अभिप्राय आणावे, सर्व गोष्टींचा विचार करावा, आणि जें बहुमतें ठरेल तें सभासदांपैकीं एका विद्वान् पुरुषानें बोलून दाखवावें, अशी वहिवाट आहे. एखाद्या सभासदावर कांहीं आरोप आपल्यास,त्याची चौकशी त्याच्या बरोबरीच्याच कांहीं सभासदांनीं करावी, असा पाठ आहे.

**साधारण लोकांच्या मुखत्यारांची सभाः**—हिजमध्यें सध्यां ६७० लोक आहेत. त्यांपैकीं ४९५ इंग्लंडाच्या वतीचे, ७२ स्काटलंडाच्या वतीचे, व १०३ ऐर्लंडाच्या वतीचे असे आहेत. हे सर्व निरनिराळ्या लोकांनीं पाठविलेले आहेत. तथापि, एकंदर सर्व रयतेस सुख होईल, अशा गोष्टी त्यांनीं केल्या पाहिजेत, असा समज आहे. ह्या सभासदांच्या नेमणुका कोठें कोठें लोकांच्या हातीं आहेत, व कोठें कोठें सरकारी नौकरांच्या हातीं आहेत. ज्यास दरसाल पांच सात हजार रुपयांचें उत्पन्न असेल, व जो अब्रूनें मोठा

असेल, त्यासच ह्या सभेंत जागा प्राप्त होते. कोणत्याही सरकारी कामास पैसा देणें झाल्यास त्याजविषयीं प्रथमतः ह्या सभेची मान्यता घ्यावी लागते; नंतर तें प्रकरण बडे लोकांची सभा व राजा ह्यांचेपुढें जावें अशी वहिवाट आहे.

**पार्लमेंट सभा.**--राजा व पूर्वीं सांगितलेल्या दोन सभा ह्यांस पार्लमेंट असें एकवट नांव आहे. फक्त त्या दोन सभांसही पार्लमेंट असें म्हणतात. हा दुसरा अर्थच ह्या ठिकाणीं ग्राह्य आहे. एकादा कायदा दोन्ही सभांनीं मंजूर केला, परंतु तो जर राजास पसंत नाहीं, तर तो कदापि अमलांत यावयाचा नाहीं. राजा आपली मंजुरी स्वमुखानें सांगतो, अथवा ती लिहून प्रगट करितो. एकादा कायदा पार्लमेंटानें पसार करूनही जर तो राजास आवडला नाहीं, तर आपणाला तो न आवडल्याबद्दलचा आपला अभिप्राय तो, "मला हा साफ आवडत नाहीं," अशा उद्धत भाषणानें दर्शवीत नाहीं; तर "ह्याविषयीं मला कांहीं बोलावयाचें आहे." असें म्हणून सौम्य व सभ्य रीतीनें तो दर्शवितो; ह्यावरून पार्लमेंटाचा मान व दर्जा हे केवढे आहेत ते पहा! असो.

न्याय करणें, राज्यकारभार चांगले रीतीनें चालविण्यास राजास मदत करणें, व हरएक प्रसंगीं त्यास सल्ला व नसलत देणें, हें पार्लमेंटाचें मुख्य कर्तव्यकर्म आहे.

मधुमक्षिका.

---

## पारिस शहर.

पारिस शहराची रचना एकंदरीनें पाहतां फारच सुरेख आहे. शहरामधून सेन नदीचा प्रवाह गेला असून तिच्या

योगानें शहराचे लहानमोठे दोन विभाग झालेले आहेत. या नदीचा शहरामधून गेलेला भाग सुमारें सहा मैल लांब असून पात्राची रुंदी सरासरी पांचशें फूट आहे. पाणी सुमारें बारा फूट खोल असून निरनिराळ्या भागीं लहान-मोठ्या आगबोटी जात येत असतात. नदीच्या पात्रांत एक दोन ठिकाणीं लहान बेटें झालीं आहेत, त्यामुळें त्या स्थ-लांस विशेष शोभा आली आहे. शहरासभोंवतीं एक तट आहे, त्याची लांबी २१ मैल आहे व त्यास ६७ वेशी आहेत. शहराचें क्षेत्रफळ सुमारें ३० चौरस मैल आहे व लोकसंख्या २८ लक्षांवर आहे. म्युनिसिपालिटीचें उत्पन्न सुमारें दहा कोट रुपये आहे.

सेन नदीच्या उत्तरेस जो शहराचा भाग आहे, त्यांत उच्च प्रतीचे पथिकाश्रम, संपन्न व्यापाऱ्यांचीं दुकानें, शिष्ट-जनांचे प्रासाद, रम्य उद्यानभूमिका, सुंदर नाटगृहें व विस्तीर्ण रथ्या आहेत. या भागांत सायंकालच्या समया-नंतर सहल करण्याची फारच मौज आहे. अशा प्रकारची मौज दुसऱ्या कोणत्याही शहरांत अनुभविण्यास सांपडाव-याची नाहीं. सर्व रथ्या अगदीं रेखीव असून त्यांचे पार्श्व-पथ त्यांस शोभण्यासारखे आहेत. ठिकठिकाणीं वर्तुलाकार व चतुष्कोण जागा असून त्यांच्या मध्यभागीं कोठें कारंजीं, कोठें विजयस्तंभ, कोठें पुतळे, असे आहेत. अशा ठि-काणीं चारचार पांच पांच रस्ते मिळालेले असतात व को-णताही रस्ता पाहिला तरी एकसारखा सरळ दिसतो. गृहांची रचना बाहेरून बहुतेक एकसारखीच दिसते. त्यांची आकृति भव्य असून मजले उंच उंच असतात. चारचार,

पांचपांच मजल्यांचीं घरें फार आहेत. फ्रेंच कादंबऱ्या वाचणारास "बुलेवार्द" हा शब्द पुष्कळदां लागला असेल. या शब्दाची व्युत्पत्ति अशी आहे: हल्लीं पारिस शहराचा जो विस्तार आहे तो पूर्वीं नव्हता. पूर्वीं शहर लहान असून त्याचे भोंवतीं तट होता. परंतु जेव्हां विस्ताराची आवश्यकता वाटली तेव्हां हे तट पाडून त्यांच्या जागीं मोठे विस्तीर्ण रस्ते बनविले. या रस्त्यांचें नांव "बुलेवार्द."— अर्थातच जेव्हां वस्ती वाढली तेव्हां श्रीमंत लोक गलिच्छ व कोंदट जागेंत न राहतां या नव्या विस्तीर्ण वीथिकांच्या प्रदेशांत राहूं लागले, त्यामुळें या भागांस मोठेंच ऐश्वर्य प्राप्त झालें. सांप्रतकालीं हे बुलेवार्द सर्व प्रकारच्या लोकांचीं विश्रामस्थानें बनून राहिले आहेत. सायंकालानंतर दीपप्रकाशाची रेलचेल असल्यामुळें, आधींच सुंदर असलेलीं भवनें विशेष शोभा पावतात. ठिकठिकाणीं पानगृहें असून त्यांच्या पुढें उघड्या जागेंत तऱ्हेतऱ्हेचीं आसनें टाकून स्वस्थचित्तानें कांहीं मंडळी आराम अनुभवीत असतात. कांहीं लोक पार्श्वपथावरून चैनीनें फिरत असतात. श्रीमंत लोक आपल्या परिवारासमवेत ऐटबाज अशा लवाजम्यासह आपआपल्या गाड्यांत बसून आसमन्तात चालू असणाऱ्या उत्सवाच्या दर्शनानेंच सुख पावतात. कांहीं लोक असंख्य दीपसमूहाच्या योगानें चित्तास आकर्षण करणाऱ्या नाटकगृहाकडे वळून आगामी उत्सवाची सोत्कंठमनानें मार्गप्रतीक्षा करीत बसतात. लोकांची चळवळ, गाड्यांची गर्दी, सर्वांची चैन करण्याविषयीं उत्सुकता—अशा सर्व प्रका-

रांनीं तो समय मोठा आल्हादजनक भासतो, व चित्ताची उद्विग्नता जाऊन वृत्ति उल्लसित होतात.

पारिस शहरांत सुमारें बारा हजार लहानमोठे पथिकाश्रम आहेत. यांशिवाय केवळ भोजनाचीच व्यवस्था ज्यांत आहे अशीं अनेक ठिकाणें आहेत. पानगृह ( काफेज ) सुमारें दीड हजार आहेत. या गृहांमध्यें केवळ काफी पिण्याचीच सोय असते असें नाहीं. तर दुसऱ्या पेयवस्तु व कांहीं प्रकारच्या खाद्य वस्तुही मिळतात. वाचावयास वर्तमानपत्रें व खेळण्याची सर्व प्रकारची सामग्रीही एथें असते. वर्षांतून कांहीं नेमलेल्या महिन्यांत पुष्कळ ठिकाणीं स्त्रीपुरुषांचे नाच ( बॉल्स ) सुरू असतात. कांहीं नाच निरनिराळ्या नाटकगृहांतही होतात. एका प्रसिद्ध नाटकगृहांत नाटकप्रयोग आटपल्या नंतर मग नाचाची तयारी होते, व त्यास सुरवात बारा वाजल्यानंतर होते. एकंदर शहरांत २०० वर स्नानगृहें आहेत. आग्निबसांच्या ३३ शाखा व ट्रामवेच्या ४१ शाखा आहेत. आग्निबसांच्या संबंधानें एवढें सांगितलें पाहिजे कीं, वाटेल त्या रस्त्यावर उभें राहून त्यांत जागा मिळण्याचा संभव नाहीं, चालत्या गाडीस थांबविण्याकरितां खूण केली असतां गाडीवाला उभी करीलच असा नेम नाहीं. यासाठीं ठिकठिकाणीं गाडीचीं स्टेशनें आहेत तेथें गेलें असतां बसण्यास चांगली सवड मिळते. आगगाडीचा रस्ता सर्व शहराच्या सभोंवतीं व शहरामध्यें कांहीं ठिकाणीं आहे. एकंदर सात कंपन्या असून त्यांचीं नऊ स्टेशनें आहेत. पारिस शहरांत सोन्याचें, रुप्याचें व तांब्याचें नाणें चालू आहे. सोन्याचीं पांच

प्रकारचीं नाणीं आहेत. त्यांची किंमत दोनपासून चाळीस रुपयेपर्यंत आहे. साधारण वापरण्यांत असणारें 'नेपोलियन्' व 'अर्धा नेपोलियन्' आहेत—त्यांची किंमत आठ रुपये व चार रुपये असते. रुप्याच्या नाण्यांत 'फ्रांक' विशेष वापरण्यांत येतो. याची किंमत सुमारें सहांपासून आठ आणे आहे. सर्वांत लहान तांब्याचें नाणें 'सेंटीम;'—याची किंमत सुमारें पैएवढी असते, व पांच सेंटिमांचा एक 'सू' असतो.

शहरांत फिरून घरीं आल्यावर रात्रीं 'हिपोड्रोम' मध्यें घोड्यांची वगैरे कसरत पाहण्यास गेलों. ही इमारत फारच विस्तीर्ण असून हिचा आकार लांबोडा आहे. मध्यभागीं एक वर्तुळ असून त्याच्या भोंवतीं सुमारें दहा हात रुंदीची मोकळी जागा आहे. या मोकळ्या जागेच्या पलीकडे प्रेक्षकांस बसावयाची जागा आहे. आठ हजारांवर माणसें बसण्याची सोय येथें आहे. घोड्यांच्या व माणसांच्या कसरतीचा प्रकार कांहीं विलक्षण नव्हता; परंतु या ठिकाणीं घोड्यांच्या व गाड्यांच्या शर्यती मात्र दृष्टीस पडल्या. प्राचीन ग्रीसच्या इतिहासांत जें वर्णन केलें आहे, तशाच तऱ्हेच्या गाड्या व तशाच तऱ्हेचे लोकांचे पोषाख होते. गाड्या फारच हलक्या असून त्यांस दोनदोन चारचार घोडे जोडलेले होते, व प्रत्येक शर्यतींत चार चार गाड्या धांवत असत; व ज्याचा जय होईल त्यास मागाहून एका सहा घोड्यांच्या गाडींत मिरवीत असत. जागा इतकी विस्तीर्ण होती कीं, एका बाजूकडून दुसऱ्या बाजूचीं माणसें दिसत नसत. विजेच्या दिव्यांचा प्रकाश असल्यामुळें

त्या दृग्विषयास अवर्णनीय शोभा आली होती. मात्र प्रका-
शाच्या चांचल्यामुळें एकंदर मजेंत थोडा कमीपणा येत होता.

विलायतचा प्रवास, भाग १ ला.

---

## महावीरचरित्राचें संविधानक.

विश्वामित्र दशरथाकडे जाऊन यज्ञविघ्ननिवारणार्थ राम व लक्ष्मण ह्यांस आपल्या आश्रमास घेऊन आला. त्यानें जनक राजासही यज्ञसमारंभ पाहण्यासाठीं निमंत्रण केलें होतें; पण त्यास स्वतः येण्यास न फावल्यामुळें त्यानें आपला भाऊ कुशध्वज व कन्या सीता आणि उर्मिला अशा तिघांस पाठवून दिलें. याप्रमाणें प्रथमतः विश्वामित्राच्या आश्रमांत या दोन राजपुत्रांची व राजकन्यांची गांठ पडली. इतक्यांत रावणाकडून एक राक्षस कुशध्वज व विश्वामित्र यांकडे सीतेविषयीं मागणी घालण्याकरितां आला. त्याचें स्वागत करून त्यांनीं त्यास तेथें बसविलें; तों ताटकेचा भयंकर शब्द ऐकूं आला. तेव्हां विश्वामित्राच्या आज्ञेवरून रामानें तत्क्षणीं तिचा वध केला. पुढें कुशध्वजानें शिवधनुष्यही तेथें आणविलें. तेंही रामानें मोडल्यावरून त्या दोन्ही कन्या राम व लक्ष्मण यांस द्याव्या असा संकेत ठरला. इतकें झाल्यावर रावणाकडील राक्षस भयचकित व निराश होत्साता चालता झाला, व लंकेंत पोंचल्यावर त्यानें झालेला वृत्तांत आजा व अमात्य जो माल्यवान त्यास सांगितला. तो ऐकतांच माल्यवानास मोठी चिंता लागली, व तेव्हांपासून रामाचा घात करण्याविषयीं तो नाना उपाय योजूं लागला. प्रथमतः महेंद्रद्वीपास जाऊन त्यानें परशु-

रामास शिवधनुष्याचा वृत्तांत सांगितला, व त्याबद्दल रामाचा सूड उगविण्याविषयीं उत्तेजन दिलें परशुरामही परम क्रुद्ध होऊन मिथिला नगरीस आला. तेव्हां रामाशीं युद्ध न करण्याविषयीं विश्वामित्र व वसिष्ठ त्याची विनंती करूं लागले, पण तो कांहीं केल्या आपला आग्रह सोडीना. तें पाहून जनकाचा पुरोहित शतानंद फार संतापला व दोघांची बोलाचाली होऊन शतानंद परशुरामास शापोदकानें भस्म करणार इतक्यांत दशरथ राजानें त्याचें निवारण केलें. पुढें रामानेंच स्वतः येऊन परशुरामास युद्धास बोलाविलें, व दोघांचा समरप्रसंग होऊन परशुराम पराभव पावला. याप्रमाणें माल्यवानाची पहिली मसलत फसल्यावर त्यानें पुन्हां बेत मांडिला. तो असा कीं, शूर्पणखेस मंथरेच्या शरीरांत संचार करावयास सांगून तिजकडून रामास वनांत घालविण्याविषयीं कैकेयीची बुद्धि फिरविली; व विराध, खर इत्यादिकांस रामाचा नाश करण्याविषयीं ताकीद देऊन वानरांचा राजा जो वालि त्यासही अनुकूळ करून घेऊन तेंच सांगितलें. इकडे परशुरामानें शस्त्रसंन्यास करून दंडकारण्यांतील मुनिजनांचें राक्षसांपासून रक्षण करण्याचा अधिकार रामाकडे सोंपविला व आपण तपश्चर्येस निघाला. रामानेंही तो मोठ्या आनंदानें पतकरिला, व त्यामुळेंच कैकेयीनें दिलेल्या वनवासाचें त्यास यत्किंचित्‌ही दुःख वाटलें नाहीं. दंडकारण्यांतील खर-दूषणवधादि वृत्तांत, तसेंच सीतेचें हरण हें सर्व जटायु व संपाति यांच्या भाषणांत सुचविलें आहे. पुढें राम व लक्ष्मण हे दोघे अरण्यांतून सीतेचा शोध करीत फिरत असतां बिभी-

पणाकडून श्रमण नांवाची एक स्त्री त्याचा लेख घेऊन आली, त्यांत त्यानें रामाचा आश्रय मागितला होता. रामानें तो लेख मान्य केला व सीतेविषयीं तुला कांहीं बातमी आहे काय असें तीस विचारलें. तिनें इतकेंच सांगितलें कीं, सीतेनें एक वस्त्र खालीं टाकिलें तें सुग्रीव, बिभीषण, हनुमान इत्यादिकांनीं तुमच्या स्नेहास्तव आपणांपाशीं ठेविलें आहे. हें समजतांच दोघे किष्किंधानगरीस चालले. पुढें रामाचें व वालीचें युद्ध होऊन वालीनें मरणसमयीं सुग्रीव व अंगद यांस राज्याधिकार देऊन रामाचें व सुग्रीवाचें अग्निसाक्षिक सख्य करविलें. यानंतर झालेल्या लंकादहनादि गोष्टी नाटकसंप्रदायाप्रमाणें कोठें पडद्यामागील भाषणांत वगैरे सुचविल्या आहेत; व थोरल्या युद्धप्रसंगाचें इंद्र व चित्ररथ यांच्या भाषणाच्या रूपानें वर्णन केलें आहे. शेवटल्या म्हणजे सातव्या अंकांत आरंभीं लंका शोकाकुल होत्साती आली आहे; व नंतर अलका म्हणजे कुबेराच्या नगरीची देवता येऊन तिचें सांत्वन करिते. शेवटीं पुष्पक विमानांत राम, सीता, लक्ष्मण व सुग्रीव–बिभीषणादि बसून अयोध्येकडे निघाले आहेत, व वाटेनें राम निरनिराळ्या प्रसंगींचा पूर्वीं घडलेला वृत्तांत सीतेस निवेदन करीत आहे. नंतर अयोध्येस पोंचल्यावर भरताची भेट होऊन रामास राज्याभिषेक झाला.

भवभूतीवरील निबंध.

---

## तीन प्रकारचीं माणसें.

जगांत तीन प्रकारचीं माणसें आढळतात, त्यांपैकीं एक प्रकार म्हटला म्हणजे केवळ स्वार्थावर नजर देणाऱ्या

कोत्या समजुतीच्या लोकांचा; दुसरा परोपकारी व दूर-दृष्टीच्या लोकांचा; व तिसरा मध्यम प्रतीच्या लोकांचा, म्हणजे जे केवळ स्वार्थपरायण नाहींत परंतु फारसे परोपकारीही नाहींत, ज्यांची दृष्टि फार दूरवर पोहोंचत नाहीं परंतु ती अगदींच अकुंचितही नाहीं. पहिल्या वर्गांतील माणसांची संख्या बरीच मोठी आहे, परंतु ती मोठी असण्याचीं कारणें अज्ञान, अविचार, दारिद्र्य, दुःसंगति वगैरे अनेक आहेत. कोणीही मनुष्य स्वभावतःच निव्वळ आपलपोट्या असेल असें मला वाटत नाहीं, परंतु हा दुर्गुण जडण्यास व त्याचा मनुष्यावर पगडा बसण्यास अल्प कारणही पुरतें. कोत्या समजुतीच्या मनुष्यास पैसा मिळवावा हें कळतें, परंतु त्याचा सत्कारणीं व्यय करावा हें समजत नाहीं. आपल्या दाराशीं कोणी अंधळा, पांगळा, दुबळा व भिकारी येईल या भितीनें तो आपलीं दारें कड्या लावून बंद ठेवील. ऐषआरामाच्या किंवा कला-कौशल्याच्या कामाचा त्यास अत्यंत तिटकारा असावयाचा. "हें घेऊन यानें काय पोट भरावयाचें आहे?" असें तो म्हणेल. व्यवहारज्ञानाबद्दल या प्रकारच्या मनुष्यास जितकी घमंड असते, तितकी थोड्याच दुसऱ्या लोकांस असेल, खर्चाच्या भीतीनें तो चांगल्या घरांत राहणार नाहीं; खर्चाच्या भीतीनें तो चांगलें अन्न खाणार नाहीं; खर्चाच्या भीतीनें धर्माचें किंवा परोपकाराचें काम त्याच्या हातून कदापि होणार नाहीं; परंतु जी गोष्ट आपण करीत नाहीं. ती करण्यास उचितच नव्हे असें दाखविण्याचा त्याचा सदोदित प्रयत्न असेल, व चांगल्याही कामाचे

ज्यास दोष मात्र दिसतील. दोघां माणसांतील तंटा सोड-विण्यास कोणी गेल्यास, "या चोंबडेपणावांचून यास काय गरज होती? त्यांनीं एकमेकांचे गळे कापले असते तर याचें काय जात होतें!" कोणी देवालय बांधावयास निघाल तर, "कोण छांदिष्टपणा हा! आजपर्यंत देवालयें नव्हतीं म्हणून का कोणाचें अडलें होतें? कोणी मोठें सुंदर घर बांधू लागल्यास, "आजपर्यंत असलीं घरें नव्हतीं म्हणून कोणी मेला होता काय?" याप्रमाणें प्रत्येक चांगल्या कामावर या व्यवहारज्ञांची टीका आहेच. कोणतीही नवीन गोष्ट कोणी करूं लागल्यास त्यांस जो राग व तिटकारा येतो व ज्या कुत्सित कल्पना त्यांच्या मनांत भरतात त्या सांगतां पुरवणार नाहींत. लोकांस ठकविणें, बुडविणें, भलत्या नादास लावणें, धर्महानि करणें इत्यादि अनेक दुष्ट हेतूंचा नवीन कृत्य आरंभणारावर ते आरोप करतील; व तेवढ्यानें त्यानें आपलें काम सोडून न दिल्यास, त्याचा पाडाव व फजिती करण्याकरितां ते खोट्याच वाईट गोष्टी रचून त्या प्रसिद्धीस आणतील. "पहा रे बुवांनो, आज असें झालें, उद्यां अमुक होणार म्हणून ऐकतों, कोणावर काय प्रसंग येईल याचा नेम नाहीं, सावध असा, नाहीं तर या माणसाच्या नादीं लागून नाहक बुडाल!" याप्रमाणें जे कोणी आपल्यासारखे नाहींत त्या सर्वांवर वाईट टीका करण्याचें त्यांस एवढेंच कारण असतें कीं, आपल्या व्यवहारज्ञानाबद्दल आपली प्रतिष्ठा व्हावी, आपण जी गोष्ट करीत नाहीं ती करणें योग्यच नव्हे असें लोकांस भासावें व विशेषत: आपल्या आळसावर व आपलपोटेपणावर पांघ-

ऊण पडावें. ज्यास स्वतः कोणतीही चांगली गोष्ट करावयास नको असते, त्यास जे दुसरे ती करीत असतील त्यांस विघ्न करण्यास पुष्कळ वेळ सांपडतो. अशा लोकांपासून शेजाऱ्यापाजाऱ्यांस, गांवच्या लोकांस, किंबहुना सर्व राष्ट्रांस प्रसंगविशेषीं मोठी भीति असते. आपल्या कवडीच्या फायद्यासाठीं दुसऱ्याचे हजारों रुपयांचें नुकसान झालें तरी ते फिकीर करीत नसतात. आपलें कोणीं थोडें नुकसान केल्यास त्याचा सूड उगविण्याकरितां त्याचें ते कितीही नुकसान झालें तरी मागेंपुढें पहायाचे नाहींत, व आपल्या स्वतःच्या प्राप्तीकरितां देश बुडाला तरी बेहेत्तर आहे असा त्यांचा निश्चय असतो. चहाडी करणें, शत्रूस फितूर होणें, कोणावर अकस्मात् घाला घालणें, हीं नीच कृत्यें या प्रकारच्या लोकांकडून होतात. या लोकांच्या प्रती लावणें झाल्यास नीचपणा, विघ्नसंतोषीपणा, कवडीचुंबकपणा, निर्दयता, विश्वासघात इत्यादि दुर्गुणांचें कमीअधिक प्राबल्य पाहूनच लाविल्या पाहिजेत. मनुष्य आपलपोटेपणाच्या अधीन झाल्यावर कोणकोणत्या दुष्ट गोष्टी करण्यास तयार होईल हें सांगणें कठीण आहे!

या प्रकारचे लोक जगांत आरंभापासून आहेतच. परंतु जर सर्वच लोक पहिल्यापासून असे असते तर आज जगाची कशी स्थिति आपणांस दिसली असती या गोष्टीची कल्पना करा. आजपावेतों माणसें शुद्ध रानटी स्थितींत राहिलीं असतीं, झोंपड्या बांधून त्यांनीं निर्वाह केला असता, त्यांमध्यें कलाकौशल्याचा व ज्ञानाचा पूर्ण अभाव राहिला असता, परस्परांमध्यें नित्य भांडणतंटे सुरू असते,

व क्रूरतेचीं आणि विश्वासघाताचीं कृत्यें प्रत्यहीं घडलीं असतीं, कोणाचाही उत्कर्ष दुसऱ्यांस सहन झाला नसता, व कोणाचेंही पुढें पाऊल पडलेलें इतरांस पाहवलें नसतें.

ही स्थिति जगास न येण्याचें कारण दुसऱ्या प्रकारचे लोक दर पिढीस थोडे थोडे उत्पन्न होत गेले हें होय. लोकांच्या हिताकरितां झटणें, कांहीं मोठी गोष्ट आपल्या हातून घडण्यासारखी असल्यास तिच्या सिद्धीकरितां आपलें पाहिजे तें नुकसान करून घेणें, मानसिक परिश्रमानें विशेष ज्ञान संपादन करणें, सत्कार्यास निरंतर मदत व उत्तेजन देणें, वृथा लोकापवादास न भिणें, हे व असेच दुसरे गुण या दुसऱ्या वर्गांतील माणसांमध्यें दिसतात. या वर्गांतील लोकांनीं जे सतत श्रम केले, त्यांनीं जो स्वार्थत्यागाचा कित्ता घालून दिला, इतरांच्या दुराग्रहामुळें त्यांस जीं संकटें भोगावीं लागलीं, त्या सर्वांमुळेंच केवळ हल्लींची सुस्थिति आपणांस प्राप्त झाली आहे.

ईश्वराच्या आराधनेसाठीं जीं सुंदर देवालयें जागोजाग बांधलेलीं दिसतात तीं कोणीं बांधिलीं ? मोठमोठया नद्यांस जे ठिकठिकाणीं घाट बांधलेले आहेत ते कोणीं बांधिले ? मोठ्या विशाल वृक्षांचें बीजारोपण कोणीं केलें व त्यांच्या छायेखालीं थकल्या–भागलेल्यास सुखानें बसतां यावें म्हणून त्यांस पार कोणीं बांधिले ? प्रवाशांच्या सोईकरितां धर्मशाळा कोणीं बांधिल्या ? विहिरी व तलाव कोणीं खणले ? अन्नसत्रें कोणीं स्थापिलीं ? ज्ञान व सदाचार यांच्या वृद्धीकरितां सर्वस्वत्याग कोणीं केला ? धर्मस्थापना व स्वराज्यस्था-

पना यासाठीं कोणीं भगीरथ प्रयत्न केले ? स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठीं कोणीं आपले देह बळी दिले ?

या सर्व गोष्टी आत्मनिरपेक्ष, दूरदर्शी व परोपकारी अशा पुरुषांनीं केल्या. अशा पुरुषांस अज्ञान, उन्मत्त, अविचारी, दुराग्रही, आपलपोटे अशा लोकांकडून किती अडथळा झाला, त्यांस किती संकटें व यातना सोसाव्या लागल्या, या गोष्टींची कल्पना एकट्या हिंदुस्तानांतील थोर पुरुषांचीं चरित्रें वाचूनही येण्यासारखी आहे. परंतु ही कल्पना पूर्णपणें मनावर बिंबण्यास युरोपांतील थोर पुरुषांचीं चरित्रें वाचलीं पाहिजेत. कारण तेथें सत्पुरुष आणि दुष्ट पुरुष यांमधील युद्ध कित्येक शतकेंपावेतों मोठ्या कडाक्यानें सुरू होतें. दुष्ट पुरुषांस धर्मबळ, राजसत्ता व संपत्ति हीं सर्व अनुकूल होतीं. सत्पुरुषांस सत्यनिष्ठेचें, परोपकारबुद्धीचें व सुविचाराचें मात्र पाठबळ होतें, व त्यांचा सर्व हवाला केवळ ईश्वरावर होता. तेथें अशी स्थिति असतां अखेरीस सत्पुरुषांचाच जय होत गेला, सत्याचें व सुविचाराचेंच प्राबल्य होत गेलें, व दुष्ट पुरुषांसही सौम्यस्वरूप धारण करून सत्पुरुषांचें बाह्यात्कारी तरी अनुकरण करणें भाग पडलें. ईश्वरी संकेताप्रमाणें मनुष्याच्या उन्नत स्थितीची व कर्तव्याची दिशा कोणती हें याप्रमाणें युरोपाच्या इतिहासावरून विशेष लक्षांत येतें.

आतां वर सांगितलेलीं परोपकारकृत्यें करणाऱ्या सत्पुरुषांच्या हेतूंची पहिल्या वर्गांतील व्यवहारज्ञांच्या रीतीनें परीक्षा करूं लागल्यास ते सर्व थोर पुरुष मूर्ख व छांदिष्ट ठरतील ! कारण हीं कृत्यें करतांना त्यांनीं आपणां स्वतःस

काय फायदा होणार याचा मुळींच विचार केला नाहीं. परंतु ज्याचे विचार अद्यापि इतके घोते व कुत्सित झाले नाहींत त्यास ह्या महात्म्यांच्या औदार्याविषयीं निदान आश्चर्य तरी वाटेल, व त्यांविषयीं थोडी तरी कृतज्ञता त्याच्या हृदयांत उत्पन्न होईल. पहा कीं, ज्यांनीं स्वदेशाच्या स्वातंत्र्यासाठीं आपले जीव अर्पण केले, त्यांना स्वतःला त्य देशापासून किंवा स्वातंत्र्यापासून कांहीं तरी उपयोग हो णार होता काय ? ज्यांनीं पराकाष्ठेचे श्रम करून गह विषयांचें ज्ञान संपादन केलें त्यांस तें लिहून ठेवण्यांत स्व तःचा कांहीं फायदा वाटला असेल काय ? ज्यांनीं अन्नस घातलीं, ते पुरुष उपाशीं मरत होते काय ? ज्यांनीं विहिरी, तलाव व घाट बांधिले, ते निरंतर तहानेनें व्याकूळ झाले होते काय ? ज्यांनीं देवालयें बांधिलीं, त्यांच्या ह तून निरंतर नरकवास होईल अशीं कांहीं भयंकर पातकें घडलीं होतीं काय ? छेः छेः ! असा प्रकार असण्याचा बिलकूल संभव नाहीं. अशीं कृत्यें करणारांचें त्यापासून स्वतःचें फारच थोडें हित होणार होतें; त्यांचा उपयोग दुसऱ्यांसच व्हावयाचा. व म्हणूनच अशा कृत्यांस परोपकाराचीं कृत्यें असें आपण ह्मणतों.

याप्रमाणें मनुष्यांचे मुख्य जे दोन प्रकार त्यांमधील भेद सांगितला. बाकी राहिलेल्या तिसऱ्या प्रकारचे लोक उभयतांचेही गुणागुण कमीअधिक प्रमाणानें घेऊन आपला चरितार्थ चालवितात. तेव्हां त्यांविषयीं कांहीं विशेष सांगावयास नको.

शाळेचा अभिमान.

# अशोकाची योग्यता.

भरतखंडांतील ज्या कीर्तिमान् राजांचीं नांवें इतिहासांत चिरस्मरणीय होऊन राहिलीं आहेत, त्या सर्वांत बौद्धधर्मप्रचारक चक्रवर्ती राजा अशोक याचें नांव अग्रगण्य आहे. द्वापारयुगांत युधिष्ठिर आणि कलियुगांत विक्रमादित्य, हर्षवर्धन ( शालिवाहन ) आणि अकबर ऐवढेच काय ते सार्वभौम राजे, ह्याच्याशीं तुलना करण्याजोगे होऊन गेले. यांपैकीं युधिष्ठिराविषयीं पौराणिक कथांपलीकडे दुसरी कांहीं ऐतिहासिक माहिती उपलब्ध नसल्यामुळें, तो वगळून बाकीच्या राजांशीं अशोकाची तुलना करूं लागलों, तर अशोक त्यांच्यापेक्षां अनेक पटींनीं श्रेष्ठ होता हें कबूल करावें लागेल. अशोकाचा पराक्रम अवर्णनीय होता, आणि त्याच्या राज्याचा विस्तारही फार मोठा होता. पूर्वेकडे वंग ( बंगाल ) आणि कामरूप ( आसाम ); दक्षिणेकडे गोदावरीचें तीर; पश्चिमेकडे सौराष्ट्र ( काठेवाड ) आणि सिंधुतट; व उत्तरेकडे काश्मीर आणि हिमालय पर्वत; अशा त्याच्या राज्यमर्यादा होत्या. येवढ्या प्रांतांत तर त्याचें पूर्ण स्वामित्व होतें. परंतु त्यांच्याही पलीकडे जीं चोल, पांडय, यान, कांबोज, गांधार, पितिनिक, आंध्र वज्रि, भोज, पुलिंद, ताम्रपर्णी वगैरे राज्यें होतीं, तीं सुद्धां त्याच्याशीं मांडलिकाच्या नात्यानें रहात होतीं. म्हणजे हिंदुस्तानचा जवळ जवळ तीनचतुर्थांश भाग त्याचे ताब्यांत होता येवढा मुलूख त्याचे पूर्वी दुसऱ्या कोणत्याही राजानें पादाक्रांत केलेला नव्हता. याच कारणासाठीं अशोकाला

हिंदुस्थानचा पहिला चक्रवर्ती राजा म्हणतात. परंतु अशोकाचें नांव इतिहासांत सुवर्णांकित होऊन राहिलें आहे, तें त्याच्या पराक्रमासाठीं किंवा राज्यविस्तारासाठीं नव्हे, तर अज्ञानांत गढून गेल्यामुळें धर्माच्या खऱ्या तत्त्वास विसरून गेलेल्या आपल्या प्रजेस एका नवीन पण शुद्ध धर्ममार्गास लावून तद्द्वारा तिची उन्नति करण्यासाठीं त्यानें केलेले परिश्रम, त्याची स्वतःची सत्यनिष्ठा आणि धर्मश्रद्धा, अनेक धर्मकृत्यें आणि त्यानें स्वतः घालून दिलेलें स्वार्थत्यागाचें उत्कृष्ट उदाहरण, या व अशा इतर सोज्ज्वल कृत्यांमुळें त्याचा कीर्तिनाद आज दोन हजार वर्षें त्रिखंडांत दुमदुमून राहिला आहे. एका जर्मन ग्रंथकारानें म्हटलें आहे—" एकाद्याचें नांव त्याच्या पश्चात् जितक्या जास्त लोकांत जास्त कालपर्यंत वंद्य होऊन राहील, तितकी त्याची योग्यता थोर समजावी. " हें जर खरें असेल तर **सार्लमेन** व **सीझर** या पाश्चात्त्य प्राचीन इतिहासप्रसिद्ध नृपतींपेक्षां अशोक फार श्रेष्ठ होता, हें क़बूल करावें लागेल. सारांश, भरतखंडाच्या इतिहासरूपी नभोमंडलांत अशोकराजा सूर्याप्रमाणें प्रकाशत होता. परंतु आमच्या लोकांच्या दृष्टीवर अज्ञानाचें पटल आल्यामुळें, आणि पौराणिक दंतकथेचें धुकें ऐतिहासिक वातावरणांत दाट पडल्यामुळें, त्या सूर्याची प्रभा आणि प्रखरता, त्याचे गुण व दोष सगळेच सारखे आम्हांस दिसेनातसे झाले आहेत. अशोकाविषयीं आतां कोणी माहिती मिळविण्याचा प्रयत्न करील तर त्यास बौद्धधर्मीय पौराणिक ग्रंथ व परदेशीय प्रवाशांनीं व ग्रंथकारांनीं लिहून ठेविलेल्या सत्यासत्यमिश्रित गोष्टी यांपलीकडे खरो-

खर विश्वसनीय अशी माहिती क्वचितच मिळेल. नाहीं म्हणावयाला खुद्द अशोकानें कांहीं शिलालेख कोरून ठेविलेले अद्यापि कायम आहेत, तेवढे मात्र पुढील इतिहासलेखकांच्या चांगले उपयोगी पडतील. एवढ्या चक्रवर्ती राजाच्या कारकीर्दीचा सुद्धां विश्वसयीय इतिहास उपलब्ध नसावा, ही गोष्ट इतिहासदृष्ट्या अत्यंत शोचनीय आहे.

अशोकाचें चरित्र.

---

## गतगोष्टींच्या ज्ञानाची आवश्यकता.

कोणत्याही वस्तूचें वास्तविक स्वरूप जाणणें म्हणजे तिचे परिणाम जाणले पाहिजेत. तेव्हां मनुष्यांचें पूर्ण ज्ञान होण्यास त्यांचीं कृत्यें जाणणें आवश्यक आहे. कोणत्या हेतूनें तीं प्रवृत्त झालीं, व कोणत्या मनोवृत्तींनीं त्यांस उत्तेजन दिलें हें कळलें म्हणजे, मनुष्याच्या मनास उत्तेजन देऊन प्रवृत्त करणारीं अत्यंत प्रबल कारणें कोणतीं, हीं आपणांस माहीत होतात. विद्यमान स्थितीचें वास्तविक ज्ञान होण्याकरितां ती भूतकाळच्या स्थितीशीं ताडून पाहिली पाहिजे. कारण कोणत्याही वस्तूस बरें वाईट म्हणावयाचें तें तुलनेनेंच म्हणावयाचें असतें. तेव्हां वर्तमानस्थितीस बरें वाईट म्हणतांना भूतस्थितीशींच तिला ताडिलें पाहिजे; कारण भविष्यस्थितीचें आपणांस मुळींच ज्ञान नसल्यामुळें तिशीं तुलना करण्याचा संभवच नाहीं. खरोखरीं पाहिलें असतां विद्यमानस्थितीविषयीं आपलें मन फार थोडा विचार करितें; तें बहुतकरून भावी स्थितीच्या विचारांत किंवा भूतस्थितीच्या

आठवणींतच प्रायः गुतलेलें असतें. मनुष्याच्या मनाच्या मुख्य वृत्ति म्हटल्या म्हणजे आनंद, दुःख, प्रीति, द्वेष, आशा आणि भय ह्या होत. यांपैकीं आनंद व दुःख हीं भूतगोष्टींविषयींच असतात व आशा आणि भय हीं भावी स्थितीविषयीं असतात; म्हणजे पहिल्यांचा विषय भूतस्थिति व दुसऱ्यांचा विषय भविष्यस्थिति होय. आतां प्रीति, द्वेष यांचाही विषय भूतस्थिति होय. कारण ज्या विषयांविषयीं त्या मनोवृत्ति होतात ते विषय त्या मनोवृत्तींच्या पूर्वींच असलेच पाहिजेत. कां कीं, ते विषय त्या मनोवृत्तींचें कारण होत; व कारण कार्यापूर्वीं असलें पाहिजे, असा सर्वसामान्य नियम आहे.

तसेंच विद्यमान जी स्थिति आहे ती पूर्वस्थितीपासून झाली आहे. तेव्हां विद्यमानकाळीं आपली स्थिति चांगली असून आपण सुखी असल्यास त्या सुखाचें कारण काय, किंवा हल्लीं आपली स्थिति वाईट असून आपण दुःख भोगीत असल्यास त्या दुःखाचें कारण काय, हें समजण्यास आपणांस भूतस्थितीचें यथास्थित ज्ञान आवश्यक आहे. आपण केवळ स्वार्थबुद्धीनें वागत असलों तरी इतिहासाचें म्हणजे भूतस्थितीचें ज्ञान आपल्या फायद्याचें आहे. आतां दुसऱ्याच्या बऱ्याचीं कामें करण्याचें [illegible]लें ज्यांनीं माथ्यावर घेतलें आहे असे जे राजे व राज[illegible] वगैरे यांस तर इतिहासाची माहिती करून घेणें [illegible] आहे. ती त्यांनीं करून न घेतल्यास त्यांचा [illegible]ण्याचीं साधनें असतां जो जाणून[illegible] मूर्खच नव्हे, पण गुन्हे-

गार होय; व त्याच्या अज्ञानापासून होणाऱ्या पीडेचा दोष त्याच्या माथ्यावर येतो.

इतिहासांत विषय बहुत असतात; परंतु त्या सर्वांत मनुष्यांचीं मनें कसकशीं विकास पावत व अधिकाधिक ज्ञानसंपन्न होत गेलीं, त्यांमध्यें विद्या कशी उत्पन्न झाली व तिची वृद्धि कशी होत गेली, कलाकौशल्यें कशीं उद्भ-वलीं व कशीं सुधारत गेलीं, विद्येस व कलांस कधीं कधीं उत्कर्षकाळ व कधीं कधीं ऱ्हासकाळ कसे आले, इत्यादि गोष्टींची हकीकत फारच उपयोगी व चमत्कारिक आहे. मोठमोठ्या लढाया व राज्यक्रांति ह्यांची माहिती राजे लोकांस विशेषेंकरून अवश्य आहे, तरी त्यांसही विद्या व कलाकौशल्यें यांच्या उदयाचीं व वृद्धीचीं कारणें समजणें कमी आवश्यक आहे, असें समजूं नये. कारण राज्यें योग्य रीतीनें चालविणें जसें त्यांचें काम आहे, तसें, आपली बुद्धि व मन सुधारणें व सज्ञान करणें हेंही त्यांचें कमी काम आहे असें नाहीं.

तसेंच असा एक सर्वसामान्य नियम आहे कीं, कोण-तीही गोष्ट उदाहरणानें जशी मनांत भरते तशी केवळ उपदेशानें भरत नाहीं. शिपाई जो तयार होतो तो रणां-गणांत युद्ध करून करूनच होतो, केवळ लढाईच्या गोष्टी ऐकून होत नाहीं; तसेंच उत्तम चितारी होण्यास म[illegible] ष्यास हातांत कलम घेऊन वारंवार चित्रेंच काढि[illegible] तशीं जेत; त्या कलेविषयीं केवळ नियम समजन[illegible]ले असतां नाहीं. शौर्याच्या कृत्यांपेक्षां कलेच्या कृ[illegible]डी विचार करितें; आहे कीं, शौर्याचीं अद्भुत क[illegible]रत किंवा भूतास्थितीच्या.

थोड्यांस सांपडते; पण कलेचे अद्भुत चमत्कार पाहण्याची ज्यास इच्छा होईल त्यास ते सहज पाहण्यास सांपडतात.

कलेचीं चमत्कारिक कृत्यें पाहिलीं असतां प्रथमदर्शनीं मन आश्चर्यानें थक्क होतें; परंतु त्यांत उत्साहशक्ति ह्मणजे हिंमत असल्यास, आश्चर्याचा झटका संपल्याबरोबर, हें अद्भुत कृत्य कोणत्या उपयांनीं सिद्ध झालें असेल अशी आकांक्षा घेऊन त्या उपायांच्या शोधाकडे तें वळतें. असें झालें म्हणजे कलेचीं अद्भुत कृत्यें पाहण्यापासून होणाऱ्या खऱ्या उपयोगास आरंभ झाला. वर सांगितलेल्या शोधाकडे आपलें मन लागलें ह्मणजे त्या शोधापासून आपलें ज्ञान व कल्पना या वाढतात. कधीं कधीं उच्छिन्न झालेली कला पुनः उदयास येते. किंवा आपल्या मुलखांत ती अपूर्वदशेंत असल्यास ती सुधारून पूर्णावस्थेस चढते. आपण आपल्या वेळची स्थिति पूर्वस्थितीशीं ताडून पाहिली असतां आपल्या वेळची स्थिति उत्तम ठरल्यास आपणांस आनंद वाटतो, व आपल्या वेळच्या स्थितींत प्राचीन स्थितीपेक्षां न्यूनता आढळल्यास ती पूर्ण करण्याविषयीं आपण यत्न करण्याची इच्छा करतों. कोणत्याही दृष्टीनें पाहिलें तरी प्राचीनस्थिति समजण्यापासून फायदाच आहे.

रासेलस.

---

## खरा शाहाणा कोण ?

...ोकांत जशीं पंढरपूर, जेजुरी, जगन्नाथ
... मानितात, तसें प्राचीनकाळीं ग्रीस
... ...ें विख्यात जागृत देवस्थान

मानीत असत. तेथील देवाचें नांव अपालो असें होतें. त्या देवावर ग्रीस देशांतल्या सर्व लोकांची पराकाष्ठेची श्रद्धा असे; आणि त्यांस कोणतीही गोष्ट समजून घ्यावयाची झाली तर, ते त्या स्थळीं जाऊन तेथें देवाची एक पुजा-रीण बाई असे, तीस विचारीत; ह्मणजे ती त्यांचे प्रश्न कितीही कठीण असले तरी त्यांचीं उत्तरें देई. तीं उत्तरें साक्षात् देवाच्या तोंडून आलेल्या उत्तरांप्रमाणें ते खरीं मानीत असत; असो. आपल्या गुरूचा ज्यास मोठा अभि-मान, असा साक्रेतीस ह्याचा चिरीफन नामें एक विद्यार्थी होता. तो एकदा सहज देल्फाय एथें गेला असतां त्यानें 'साक्रेतिसापेक्षां शाहाणा असा कोणी मनुष्य आहे काय?' म्हणून तेथील पुजारणीस प्रश्न केला; तेव्हां तिनें सांगितलें कीं, 'कोणी नाहीं!' साक्रेतिसास हें उत्तर कळल्यावर तो पराकाष्ठेच्या घोंटाळ्यांत पडला. त्यास ह्याचा कांहींच अर्थ समजेना. तो आपल्या मनांत विचार करूं लागला कीं, अहो, ह्या उत्तराचा अर्थ काय असावा बरें? मजविषयीं तर मला पक्की खातरी आहे कीं, माझ्या ठायीं थोडें किंवा बहुत कांहींच शाहाणपण नाहीं. बरें, कौल खोटा असेल, असाही अंदेशा घेववत नाहीं; कां कीं, देवता कधींही खोटें बोलत नाहींत. अशी दोहोंकडून अडजण आल्यावर त्यानें ह्याविषयीं एकाग्र चित्त करून फार विचार केला; व ह्या उत्तराचा अर्थ काढण्यासाठीं मनस्वी .सतां घेतला. तो असा कीं, अथेन्स शहरांत एक ..र करितें; तो मोठा अंमलदार असून राज्यप्रकरणां भूतस्थितीच्या व मोठा मुत्सद्दी होता. त्या

नामांकित शाहाणे असत त्यांमध्यें तो मोडत असे; व दुसरे लोक त्याच्या आंगीं जितकी योग्यता समजत, तिजपेक्षां आपल्या आंगीं अधिक योग्यता आहे, अशी त्याची खात्री असे. त्यास साक्रेतिसानें प्रथमतः कांहीं प्रश्न करून पाहिलें.

त्याशीं संभाषण केल्यावरून साक्रेतिसास दिसून आलें कीं, यास कांहीं समजत नाहीं. मग त्यानें हें त्याचें अज्ञान चांगलें समजण्याजोग्या शब्दांनीं त्यास व्यंग्योक्तीनें सुचविलें. तेणेंकरून तो गृहस्थ, व दुसरे जे लोक तेथें होते ते साक्रेतिसाचा द्वेष करूं लागले. नंतर राज्यप्रकरणांत बाणा बाळगणारे जे आणखी दुसरे लोक होते, त्यांजकडे जाऊन त्यांशीं संभाषण करून त्यांसही कांहीं येत नाहीं असें त्यानें ठरविलें. ह्या त्याच्या शोधापासून त्यास इतकेंच फळ प्राप्त झालें कीं, त्यानें आपणांस शत्रु मात्र पुष्कळ करून घेतले. राज्यप्रकरणीं लोक संपल्यावर तो कवींशीं संवाद करूं लागला; आणि पाहतो तों त्यांच्या ठायीं तर राजप्रकरणीं लोकांच्यापेक्षां फारच अहंता भरली आहे, आणि विद्या व ज्ञातेपणा हे गुण खरोखरी ह्मटले असतां फारच कमी आहेत, असें त्याच्या नजरेस आलें. पुढें त्यानें ज्ञात्याचा शोध कारागीर लोकांमध्यें चालविला. त्या लोकांत त्याच्या दृष्टीस असें पडलें [illegible] खाद्या कामांत एकादा वाकबगार असला ह्मणजे [illegible] गारीमुळें तो कारागीर आपणांस इतरही [illegible] में समजे. सारांश; पुष्कळ बढाई [illegible] सर्व लोकांमध्यें होताच; व ते

लोक मोठे डौली असत, ह्यामुळें ते आपण सर्वज्ञ आहों असा आव घालीत, व कोणताही विषय निघाला असतां त्यावर पांडित्य करण्यास मागें पुढें पहात नसत; आणि ते स्वभावतः धूर्त असत, ह्यास्तव कोणताही प्रसंग पडला असतां आपलें अज्ञान बाहेर पडूं न देतां ते धैर्यानें तो मारून नेत. ह्याप्रमाणेंच त्यानें परदेशच्या लोकांतही शोध केला; पण त्यास कोणी ज्ञाता सांपडला नाहीं.

नंतर साक्रेतिसानें आपणाविषयीं विचार केला, व ज्यांशीं त्यानें आजपर्यंत वादविवाद केले त्यांशीं आपली तुलना केली. त्या वेळेस त्याच्या नजरेस असें आलें कीं, मजमध्यें व लोकांमध्यें भेद हाच कीं, ज्या गोष्टी त्यांस वस्तुतः समजत नाहींत, त्या मलाही समजत नाहींत. पण मी आपलें अज्ञान प्रांजलपणें पतकरतों, आणि ते तसें करीत नाहींत. ह्या सर्व विचारांवरून त्यानें असा सिद्धांत केला कीं, वास्तविक ज्ञाता ह्मटला असतां एक ईश्वर मात्र आहे. आतां अपालोच्या पुजारणीनें मला ज्ञाता ह्मटलें, याचा अर्थ इतकाच कीं मनुष्यांत वास्तविक ज्ञाता तर कोणीच नाहीं. तेव्हां जो मनुष्य साक्रेतिसाप्रमाणें आपले अज्ञान समजतो तोच मनुष्यांत ज्ञाता होय.

साक्रेतिसाचें चरित्र.

---

## झोंप.

प्राणिमात्राचे श्रम परिहार करणारी, दु:ख
विसर पाडणारी, क्षणमात्र चिंता दूर क
शरिरास आराम देणारी अशी

वरें? अर्थात् निद्रा. ज्यांना ही निद्रा सहज प्राप्त होते, त्यांना तिचें कांहींच महत्त्व वाटत नाहीं. पण ज्यांना ती हवी असते, त्यांना ती न मिळाल्यास अतिशय त्रास भोगावा लागतो, या कुंभकर्णप्रियेचा साराच क्रम अगदीं विचित्र आहे! भव्य मंदिरें, दिव्य शरीरलावण्य, अनंत लक्ष्मी इत्यादि जिनसांस सामान्य कामिनी लुब्ध होतात; गरीबगुरीबांकडे त्यांना ढुंकून सुद्धां पहावेंसें वाटत नाहीं! निद्रेची तशी गोष्ट नाहीं. राजवाड्यांतील पुष्पखचित शय्या तिचें आवडतें विलासस्थान असत नाहीं! दुपारपर्यंत ओरओरडून पांखरें हांकतां हांकतां थकून गेलेल्या कुणब्याचा माळा, किंवा मासे पागतां पागतां शिणून जाऊन आंग टाकण्याविषयीं उत्कंठ झालेल्या धीवराचा नदीच्या कांठचा तापलेला काळा ठिक्कर खडक किंवा चारही दिशांनीं वाहणाऱ्या वाऱ्यास ज्यांत आंत बाहेर हव्या तितक्या वेगानें जाण्यायेण्याची पूर्ण परवानगी असते असें एकाद्या भिकार धनगराचें मोडकळीस आलेलं खोपट, हीं या निद्रेस जितकीं आवडतात, तितके रुप्याचे छपरपलंग आणि त्यांवरील किनखापाच्या गाद्या आवडत नाहींत! सारांश, ही सांपडूं नये तेथें सांपडते व ज्यांना भाळूं नये त्यांना भाळते!

असें जरी आहे तरी हिची थोडीबहुत कृपा असल्याशिवाय मनुष्यास फार दिवस जिवंत राहतां येणार नाहीं.

...गा वाणीनें श्रोतृसमुदायाच्या मनोवृत्तींस कधीं भरती ...ी आणणाऱ्या महान् वक्त्यास, तोफांच्या व ...ा वर्षावास तोंड देऊन जिवाची पर्वा ... शत्रूंव( चालून जाणाऱ्या

चीरास, शांत व एकांतस्थानीं बसून अनेक तास शास्त्रचिंतन करणाऱ्या अथवा ग्रंथ लिहिणाऱ्या तत्त्वज्ञान्यास, द्रव्यार्जनासाठीं कृष्णपक्षांतील मध्यरात्रीच्या सुमारास वेषांतर करून व सशस्त्र होऊन धनाढ्यांचीं घरें फोडण्यास निघणाऱ्या चोरास, सारांश, या पृथ्वीतलावरील प्रत्येक स्थितींतील व वर्गांतील मनुष्यास निद्रेवांचून फार दिवस कंठितां येत नाहींत. ज्यावर तिची पूर्ण अवकृपा झाली त्याचें दुर्दैव पुरें ओढवलें म्हणून समजावें! ज्याला ही बराच काल प्राप्त झाली नाहीं तो ती प्राप्त होण्याकरितां काय पाहिजे तें बोलण्यास व करण्यास तयार होईल !

यावरून झोंप ही मनुष्याच्या अनामयास किती आवश्यक आहे हें वाचकांच्या लक्षांत आल्याखेरीज राहणार नाहीं. झोंप लागली ह्मणजे थकलेल्या गात्रांस विश्रांति सांपडून तीं ताजींतवानीं होतात, आणि तीं तशीं झालीं ह्मणजे आपणांस पुन: उद्योगास लागावेसें वाटतें. झोंपेशिवाय शरीराची वाढ चांगल्या प्रकारची व्हावयाची नाहीं; झोंपेशिवाय प्रकृति निरोगी रहावयाची नाहीं; झोंपेशिवाय मनाचे व शरीराचे व्यापार चालावयाचे नाहींत. निश्चित प्रमाणापेक्षां ही अधिक व कमी घेण्यानें नुकसान होतें. अगदीं लहान मुलास बारापासून पंधरा तास झोंप पाहिजे. तरुण पुरुषास सातपासून आठ, व तरुण स्त्रीस आठपासून नऊ तास झोंप पाहिजे. वृद्ध पुरुषांस व स्त्रियांस चार पांच तास झोंप बस्स होते. नुकतींच उप
ठरा किंवा वीस तासपर्यंत निजता
व उद्योगाच्या मानानें ह

तरच प्रकृति नीट रहाण्याचा संभव असतो. झोंप न येणें व फार येणें दोन्हींही प्रकृति नीट नसल्याचीं किंवा तींत कांहीं तरी बिघाड होऊं लागल्याचीं चिन्हें होत असो. आतां या कुंभकर्णप्रियेच्या विशेष कृपेचीं कांहीं उदाहरणें देऊन तिचा निरोप घेतों.

सन १७५६ त इंग्लंडातील कांहीं वैद्यांपुढें इलिजाबेथ आरविन नांवाच्या एका बाईच्या रोगाची चिकित्सा झाली. तींत असें निष्पन्न झालें कीं, ही बाई दहा वर्षेंपर्यंत प्रत्येक दिवशीं चोव्वीस तासांपैकीं सतरा तास निजत असे, व १७३८ सालीं ही चार दिवस एकसारखी निजली होती! डॉक्टर बॉडी असें म्हणतो कीं, या बाईस जागें करण्यासाठीं नानातऱ्हेचे उपाय केले. तिच्या पाठीला मध चोपडून ती मधमाशांकडून चाववली, टांचण्या टोचल्या, व चाबूक ओढून पाहिले, पण ती म्हणून कांहीं केलें तरी जागी झाली नाहीं! पुढें जेव्हां ती आपोआप जागी झाली तेव्हां ती जणूं काय पुरेशी झोंप न मिळाल्यामुळें खिन्न झाल्यासारखी व संतापून गेल्यासारखी दिसली! याच वैद्याच्या पहाण्यांत दुसरी एक बाई आली होती, तिची हकीकत फारच विलक्षण आहे. या बाईचें वय सुमारें तेवीस वर्षांचें असून ती अगदीं निरोगी होती. एकदा हिच्या एका मैत्रिणीच्या शरीरावर शस्त्रवैद्यांनीं विशेष अवघड असा शस्त्रप्रयोग करण्याचा विचार ठरविला. तो हिच्या मनांत पाहण्याची इच्छा उत्पन्न झाल्यामुळें तो करतांना हिला जवळ उभें राहूं द्यावें असें ठरलें. पुढें उद्यां तो प्रयोग होणार तर आज ही बाई त्याचें चिंतन करीत अंथ-

रणावर जी पडली ती त्या प्रयोगाच्या यातनांच्या कल्पनेनें अगदीं भांबावून गेली, व अखेरीस सकाळ होण्यापूर्वींच तिला अपस्माराचा झटका येऊन जी झोंप लागली ती त्रेसष्ट तासपर्यंत राहिली! मोठमोठे डॉक्टर आले व त्यांनीं परीक्षा करून असें ठरविलें कीं, हिला जागी करण्यास तुंबडी लाविली पाहिजे. त्याप्रमाणें तुंबडी लावून तिला जागी केल्याबरोबर पुनः अपस्माराचा झटका आला, व त्यासरशीं तिला जी गाढ झोंप लागली ती एक सगळा पंधरवडा टिकली! पुढें सुमारें एक वर्षभर ती नेहमींप्रमाणें सात आठ तास निजत असे. पण त्यानंतर कांहीं कारण नसतां एकाएकीं तिची प्रकृति बिघडली, व पुनः लांब झोंपेचा प्रकार सुरू झाला; तो असा कीं, बारा वर्षांत ती सारखी तीसपासून चाळीस तास निजत असे! यानंतर ती पुनः पूर्वस्थितीवर आली, व त्या स्थितींत सहा महिने गेल्यावर फिरून अठ्ठेचाळीस तास निजूं लागली! हा शेवटचा विकार होण्यापूर्वीं तिला दोन तीन महिने मुळींच झोंप आली नाहीं. हिच्या लांब झोंपेचा आरंभ सुमारें मध्यरात्रीच्या सुमारास होई, व तींतून ती उठली म्हणजे तिला जागें रहाण्याची मोठी भीति वाटे.

याच बाईसारखी नॉरफाक नांवाच्या कौंटींतील इलिझाबेथ परकिन्स नांवाच्या बाईची गोष्ट सांगतात. ही बाई आठवड्यांपैकीं एकच दिवस जागी असे! एकदा ती झोंपेंतून उठली ह्मणजे तिला जागी ठेवण्यास, व एकदा निजली ह्मणजे तिला पुनः जागी करण्यास फार प्रयास पडत. पुढें एका 'नाडीपरीक्षदरसशेंदूरमात्रावैद्या'नें तिची

परीक्षा करून तिच्या आप्तांची अशी खात्री केली कीं, 'ही झोंपेचें थोतांड करीत आहे; हिची झोंप खरी नाहीं. परवानगी मिळेल तर हिचा रोग काढून टाकण्यासारखा आहे.' वैद्यबुवांनीं अशा प्रकारची खात्री दिल्यामुळें आप्तांनीं प्रयत्न करून पहाण्यास रुकार दिला. तेव्हां या राजश्रीस उपाय करणें भाग पडलें. टाणाटोण्यांनीं ती जागी होत नाहीं असें पाहून, त्या मूर्खानें कांहीं तीव्र विषारी वनस्पतींच्या मुळ्यांचा रस काढून तिच्या नाकांत घातला! या रसानें ती जागी तर झाली नाहींच; पण बिचारीच्या नाकाला, ओंठाला, आणि चेहऱ्याला मोठमोठे फोड येऊन चामड्याचे कळपे निघाले!

ब्रिटिश संग्रहालयांत एक पुस्तक ठेविलें आहे, त्यांत निकोलास हार्ट नांवाच्या एका डचमन्‌विषयीं अशी गोष्ट सांगितली आहे कीं, याचा जन्म होण्यापूर्वी याची आई पांच दिवस अहोरात्र निजली होती, व याचा जन्म झाल्याबरोबर बाळबाळंतिणीस पुनः पांच दिवस गाढ झोंप लागली! पुढें प्रतिवर्षीं आगष्ट महिन्यांत वाढदिवसाचे रात्रीं या मुलास झोंप लागे ती पांच दिवस टिके!

दीर्घनिद्रेच्या गोष्टी अगदीं अलीकडच्या आहेत असें नाहीं. ग्रीक व रोमन लोकांतील जिज्ञासु गृहस्थांनीं आपल्या पहाण्यांत आलेल्या व लिहून ठेवलेल्या गोष्टींपैकीं कित्येक अद्यापि प्रसिद्ध आहेत. ड्रॅटिरसाच्या वेळेस एक गृहस्थ तीन दिवस एकसारखा निजून होता. ॲरिस्टॉटलनें एका बाईविषयीं असें लिहून ठेविलें आहे कीं, ती घरांतील माणसांचा डोळा चुकवून कोठें तरी जाऊन निजे

ती दोन किंवा तीन महिने ! अकराव्या ग्रेगरी नांवाच्या पोपाच्या कारकीर्दींत एक गृहस्थ भिंतीमागें लपविलेल्या एका पेटींत सात वर्षें निजून राहिला ! घरच्या माणसांस तो कोठें तरी निघून गेला असावा, असें वाटलें होतें ! पण जेव्हां तो जागा झाला तेव्हां असें म्हणूं लागला कीं, मी फार निजलों असें काय म्हणतां ? माझ्या समजुतीप्रमाणें फार झालें तर मी एक रात्र आणि अर्धा दिवस इतका काय तो निजलों असेन ! जर्मनींतील थकलेला एक कुणबी उन्हाळ्यांतील एके दिवशीं गवताच्या एका खोलींत जाऊन जो निजला तो पुढला एक पावसाळा व हिंवाळा उलटून गेला तरी उठला नाहीं ! प्लिनी असें म्हणतो कीं, एपिमिनिडीस नांवाचा कोणी ग्रीक तत्त्ववेत्ता एका प्रसंगीं रागावून व थकून गेल्यामुळें एका गुहेंत जाऊन जो निद्रित झाला तो सत्तेचाळीस वर्षें या अंगचा त्या अंगावर झाला नाहीं.

वाशिंग्टन् इर्व्हिंग् म्हणून अमेरिकेंत जो प्रसिद्ध निबंधकार होऊन गेला त्यानें आपल्या पुस्तकांत रिप व्हॅन विंकल नांवाच्या एका मानवी कुंभकर्णाची जी मनोरंजक गोष्ट लिहिली आहे, तिला बहुशः या एपिमिनिडिसच्या गोष्टीचा आधार घेतला असावा.

विविधविषयसंग्रह.

---

# फ्रान्स देशाचा संक्षिप्त इतिहास.

ज्या प्राचीन केल्ट लोकांस रोमन लोक गॉल असें म्हणत ते लोक या देशचे मूळचे राहणारे होत. रोमचा